म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा.वा
दा. क्र. 3903

शि. म. परांजपे वाङ्मय माला
पुष्प ३२

# ल ची स्वातंत्र्य कथा

३९०३





IRBK-0103173
IRBK-0103173

ग्रं. सं. नालय, ठ

य. गो. जोशी
प्रकाशन, पुणे.
किंमत
१०
आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3143

स्वातंत्र्यशाहीर शि. म. परांजपे वाङ्मयमाला

# टायरोलची स्वातंत्र्य-कथा

आ० २८९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २८८८१
विभाग बा. वा.
क्रमांक ११७७१
ना. दि. ३१७३
वाचनालय शाखा

३

प्रस्तावना :

प्रा. शं. दा. चितळे, एम्. ए., बी. टी.

★

प्रथमावृत्ति

१० जानेवारी १९४८

IRBK-0103173

किंमत १० आणे

IRBK-0103173

एकमेव विक्रेते :

चित्रशाळा प्रकाशन, सदाशिव, पुणें २

प्रकाशक :
**यशवंत गोपाळ जोशी,**
६२३/१५ सदाशिव, पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

मुद्रक :
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु,**
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण पेठ,
पुणें २.

# प्रकाशकाचें निवेदन

स्वातंत्र्यशाहीर शि. म. परांजपे वाङ्मयमालेचें हें तिसरें पुस्तक होय. विद्यार्थ्यांचे हातांत इतर कोणचेंही बाल-वाङ्मय देण्यापेक्षां शिवरामपंतांचें हें तेजस्वी वाङ्मय दिल्यानें त्यांच्या मनाची चांगली जोपासना होईल.

याहि पुस्तकास माझे स्नेही प्रा. शं. दा. चितळे यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. या मालेंतील पुढील पुस्तकेंहि यथावकाश प्रसिद्ध होतील.

पुणें,
१०-१-१९४८

यशवंत गोपाळ जोशी

3763

**या मालेंतील पहिलीं दोन पुस्तकें**

| | | |
|---|---|---|
| १ | स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ | ०-१२-० |
| २ | ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला ? | १-०-० |

— एकमेव विक्रेते —

◆ चित्रशाळा प्रकाशन, सदाशिव, पुणें २ ◆

स्वातंत्र्यशाहीर " काळ " कर्ते

# शिवरामपंत परांजपे यांचें

# चरित्र

लेखक :

**वामन कृष्ण परांजपे, बी. ए., एल्एल्. बी.**

प्रस्तावना : गंगाधरराव देशपांडे

★

● शिवरामपंतांच्या नातवांनीं लिहिलेलें हें चरित्र असून त्यावर केसरी, लोकशक्ति, विविधवृत्त, मनोहर, प्रा. माटे, इत्यादींचे अत्यंत सुंदर अभिप्राय आलेले आहेत. शिवरामपंतांच्या वाङ्मया-इतकेंच त्यांचें चरित्रहि हृदयंगम आहे.

**पृष्ठसंख्या ३२० : तीन रंगी कव्हर : शिवाय आर्ट पेपरवरील दहा चित्रें**

★

## किंमत पांच रुपये

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन-कार्यालय, ६२३/१५ सदाशिव, पुणें २

१८८६ वा. वा. ११०१ १/३।४

# ◆ ◆ शूर टायरोल ◆ ◆

## या स्वातंत्र्य-कथेचें वैशिष्ट्य

कै. शिवरामपंत परांजपे यांनीं 'काळ' मधून अनेक स्वातंत्र्य-युद्धांची वृत्तें रसवंती भाषेंत दिलीं त्यांतही विशेष उद्देश दिसून येतो. स्वातंत्र्य पाहिजे ही जाणीव उत्पन्न करणें हा या लेखांचा उद्देश होताच, पण तें मिळविण्यासाठीं कोणते विविध उपाय या युरोपियन राष्ट्रांनीं योजले हेंहि पंतांनीं सांगितलें आहे. या अनेक साधनांपैकीं गुप्तमंडळ्या स्थापून कट करण्याचा मार्ग ग्रीसनें अवलंबिला, तर डोंगराळ प्रदेशांच्या आश्रयानें व संघटनकौशल्यानें स्विस लोक स्वतंत्र राहिले. पण ही सर्व झालीं मानवनिर्मित नि कष्टार्जित साधनें. आपणा हिंदवासीयांना संवय झालेली परमेश्वरावर विसंबून राहण्याची. या वृत्तीला आवाहन करण्यास टायरोलची स्वातंत्र्यकथा उपयुक्त आहे. 'काळ' कर्ते लिहितात, "ईश्वराची कृति फार अगाध आहे.....तो कोणाच्या हातून काय करवील याचा कांहीं नियम नाहीं. मोठमोठ्यांच्या हातून ज्या गोष्टी घडून येणें अशक्य असतें, त्या गोष्टी यःकश्चित् क्षुद्र लोकांच्या हातूनहि परमेश्वर घडवून आणतो. (उदाहरणार्थ, रोमन साम्राज्याचा नाश रानटी टोळ्यांनीं केला; मोगलाईचा शेवट सह्य डोंगरांत राहणारांनीं केला.)" आपल्या स्वातंत्र्ययत्नांत परमेश्वर साहाय्यक असल्यानें आपण तो यत्न केल्यास यश मिळेल असा विश्वास भारतीयांत निर्माण करण्याचा या लेखाचा हेतु दिसतो.

## देव मदत करील

टायरोल देश किती चिमुकला! पण ईश्वरी सामर्थ्यानें नेपोलियन सारख्याशीं या देशानें तोंड दिलें. टायरोलीज हे हिंदु धर्मीयांप्रमाणेंच कसे धर्मभोळे आणि श्रद्धाळू होते याचें वर्णन पंतांनीं विस्तारानें केलें आहे. पूर्वींचे साधु-संत आपल्याला गुप्तपणें साहाय्य करीत आहेत यावर टायरोलीजांचा विश्वास होता. अशी कथा वाचल्यावर भारतीय वाचक म्हणणारच कीं, "असें आहे तर आपण स्वस्थ कां बसावें? आपला देवहि आपल्याला मदत करील." ही वृत्ति निर्माण करण्यास या लेखांचा उपयोग झाला असेल आणि पुढेंहि होत राहील. संख्याबल कमी असतांहि ध्येयनिष्ठेनें कार्य केल्यास बलाढ्य शत्रूपासूनहि यश मिळतें ही गोष्ट टायरोलची स्वातंत्र्य-कथा तरुण वाचकांना सतत शिकवीत राहील.

* * *

## डोंगराळ प्रदेश

टायरोल हा युरोप खंडांतील एक छोटासा प्रदेश आहे. त्याच्या-भोंवतीं इटाली, स्वित्झर्लंड, बव्हेरिया आणि ऑस्ट्रिया हे देश आहेत. 'संयुक्त ऑस्ट्रिया'चा हा घटक देश. ऑस्ट्रिया नि टायरोल यांची ही गट्टी अनेक शतकांपासून आहे. या टायरोल देशांत जिकडे तिकडे डोंगरच डोंगर आहेत. कारण सर्व देशभर आल्पस पर्वताच्या रांगा पसरलेल्या आहेत. कांहीं ठिकाणांची उंची ९,००० फूट आहे. येथें लीच (Lech) आणि इन (Inn) या नद्या वाहतात. या नद्यांचें खोरे म्हणजेच टायरोल. या प्रदेशाचें

क्षेत्रफळ १०,३१६ चौरस मैल व लोकसंख्या (इ. स. १९२३ मध्यें) ३१४,८३६ आहे. यांतील बहुसंख्याकांची भाषा जर्मन व बाकीच्यांची इटालियन किंवा अन्य रोमन उपभाषा आहे. धर्माच्या दृष्टीनें पाहतां रोमन कॅथॉलिकांचा भरणा विशेष, पण इन्स्ब्रुकचे कांहीं रहिवासी प्रॉटेस्टंट पंथीयहि आहेत.

## शिक्षण-प्रसार

टायरोलीजांचा मुख्य धंदा शेतीचा. येथील धर्मगुरूंची भरतीहि शेतकरीवर्गांतून होते. त्यांच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था करण्यांत येते. सर्वसामान्य नागरिकांतहि शिक्षणाचा प्रसार झपाट्यानें होत आहे. प्राथमिक शिक्षण अनिवार्य आहे, आणि त्यापुढील शिक्षणासाठीं इन्स्ब्रुक येथें राजधानीच्या नगरांत, सुव्यवस्थित विद्यापीठ आहे. तरुणांना लष्करी शिक्षण घेण्याची सक्ती आहे. युरोपीय परिस्थितींत हें शिक्षण कां आवश्यक आहे हें अनेक वेळां सिद्ध झालेलें आहे.

## शेती हा मुख्य धंदा

शेतीला या देशांत इतकें महत्त्व आहे कीं, त्या कामासाठीं वर्षांतून ३-४ महिने शाळा बंद ठेवून शिक्षक, विद्यार्थी नि पालक हेच काम करतात. हें काम संपलें कीं पुनः शाळा सुरू. आपल्याकडे तशी पद्धति सुरू झाली तर शेतकऱ्यांना आपलीं मुलें शाळेंत पाठवावीं ही गोष्ट लवकर पटेल. अशा रीतीनें केलेल्या शेतींतून ज्वारी, गहूं, बार्ली, बटाटे यांचें पीक निघतें. फळफळावळींची लागवड आजकाल चांगली होऊं लागली आहे. जेथें शेती होत नाहीं तेथील प्रदेश अरण्यमय आहे.

त्या ठिकाणीं लांकूड तोडणें, ( Forestry ) वन्य वस्तूंची पैदास करणें हा व्यवसाय चालतो. या जंगलांतील लांकडापासून कागदाला लागणारा पल्प किंवा रस तयार केला जातो. या कामाच्या खालोखाल महत्त्वाचा धंदा म्हणजे खाणकाम करण्याचा. मीठ, लोखंड, जस्त यांच्या खाणी आहेत. मध्ययुगांत सोनें-चांदीं येथें सांपडत असे, पण आतां हे धातु आढळत नाहींत. टायरोलला पुरेल इतकें कापसाचें नि लोंकरीचें कापड विणण्याचे कारखाने आहेत. शक्य तेथें विद्युत्-शक्तीचा उपयोग केला आहे. डोंगरावरून पडणाऱ्या जलप्रवाहांच्या साहाय्यानें ही वीज निर्माण करण्यांत येते.

## गोड आवाजाची देणगी

इतर युरोपियनांच्या मानानें टांयरोलीज नागरिक धर्मभोळे वागणुकीनें सभ्य, नि अतिथिसत्कारास तत्पर, अशी त्यांची प्रसिद्धि आहे. एकदम ते कोणाशीं मिसळणार नाहींत. साधारणतः आपल्याच कामांत गढून गेलेले दिसतील. उपजतच या लोकांना गोड गळ्याची देणगी आहे. कित्येक टायरोलिज गायकीचा व्यवसाय करतात; त्यांच्या गायन-मंडळ्यांबद्दल जर्मनी नि ऑस्ट्रियामध्यें विषेश ख्याती आहे.

* * *

## टायरोलचा पूर्वेतिहास

हा प्रदेश पूर्णपणें स्वतंत्र असा सहसा नव्हता. प्राचीन काळीं ‘रोमन लोकांचे’ साम्राज्यांत हा देश समाविष्ट होता. हें साम्राज्य लयास गेलें तेव्हां ट्यूटॉनिक टोळ्यांनीं येथें आक्रमण केलें. त्यानंतर

म्हणजे बाराव्या शतकापासून कांहीं सरदार घराण्यांचा उदय झाला. त्यांपैकीं एक बलाढ्य सरदार ज्या किल्ल्यांत राहत होता त्याचें नांव टायरोल असें होतें. त्यावरून या प्रदेशासहि तेंच नांव मिळालें. इ. स. १३६३ पासून ऑस्ट्रियाचें जें हॅप्सबुर्ग राजघराणें त्याचें आधिपत्य येथें सुरू झालें. या राज्यांत टायरोलीजना अंतर्गत कारभारांत स्वातंत्र्य असे. त्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती कधीं न झाल्यानें ऑस्ट्रियाचें राज्य हें परराज्य नाहीं असें त्यांना वाटे.

## बव्हेरियाच्या तावडींत

पण हें त्यांचें समाधान बव्हेरिया आणि सम्राट् नेपोलियन यांनीं हिरावून घेतलें. फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या धुमश्चक्रींत हा प्रदेश बव्हेरियानें जिंकून घेतला नि सुलतानशाही अमल सुरू केला. त्या जुल्माचें चित्र पुढील लेखांतून रेखाटलेलें आहे. या बव्हेरियाला नेपालियनचा पाठिंबा होता. ऑस्ट्रिया स्वतः दुर्बल नि नेपोलियनकडून पराभूत झालेला. अशा स्थितींतही टायरोलीजनीं स्वातंत्र्ययुद्ध घोषित केलें. इ. स. १८०९ सालीं त्यांना कांहींसें यशही आलें. याच स्वातंत्र्य-युद्धाचा इतिहास प्रस्तुत पुस्तकांत आहे. शौर्य, साहस, त्याग हे गुण टायरोलीजांत अमोप होते, पण सैनिकसंख्या तोकडी नि देश लहानसा. तरीहि १०-१५ वर्षांपेक्षां जास्त काळ परकीय अमलांत त्यांना राहावें लागलें नाहीं. इ. स. १८१५ च्या नंतरच्या संधिपत्रकांत ( तहनाम्यांत ) टायरोल हें तद्देशियांच्या इच्छेनुसार ऑस्ट्रियांत सामील करण्यांत आलें.

## महायुद्धानंतर

पहिल्या महायुद्धानंतर संयुक्त ऑस्ट्रियांत एक घटक राष्ट्र म्हणून टायरोल प्रांत नांदत होता. सांप्रत या देशाची निश्चित राज्यघटना काय आहे हें सांगणें कठिण आहे, कारण अद्याप या सर्व घटना संक्रमणावस्थेंतच आहेत. सामान्यतः असें म्हणतां येईल कीं, पूर्वींप्रमाणेंच ऑस्ट्रियाच्या संयुक्त राज्यांत राहणें टायरोलीजांना आवडेल. या योजनेंत परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, कायदा, सुव्यवस्था हीं खातीं वगळून बाकीच्या बाबतींत टायरोलीजांना स्वातंत्र्य राहतें.

*　　　*　　　*

## हुतात्मा होफर

बव्हेरियाच्या जुलुमाविरुद्ध आणि नंतर नेपोलियन बोनापार्ट-विरुद्ध ज्यांनीं बंडाचें निशाण उभारलें त्यांच्यांत तीन प्रमुख माणसें होतीं—होफर, स्पेक्बेचर आणि हॅस्पिंजर. यांपैकीं प्रमुख पुढारी ॲन्ड्र्यू होफर होय. त्याचें त्रोटक चरित्र मिळालें तें येथें देत आहें.

## इन्स्ब्रुकचा मुख्य झाला

त्याचा धंदा खाणावळवाल्याचा. मनांत देशप्रेम असल्यानें तो स्वातंत्र्युद्धांत एक सैनिक म्हणून गेला; आपल्या गुणानें तो सेना-नायक झाला. इ. स. १७९६ ते १८०५ पर्यंत बव्हेरियाविरुद्ध उठावणी करण्यांत आली, त्या वेळीं होफरला पकडण्यासाठीं बव्हेरियानें बक्षिसें लावलीं होतीं. पण कोणाहि टायरोलीजनें

घरभेदेपणा केला नाहीं. इतकेंच नव्हे तर इ. स. १८०९ मध्यें बव्हेरिया आणि नेपोलियन यांच्या संयुक्त फौजांना न जुमानतां त्यानें टायरोलची राजधानी इन्स्ब्रुक येथें मोठ्या थाटानें प्रवेश केला. लोकांनीं त्याला सेनापति आणि राज्याचा प्रमुख म्हणून निवडलें.

## माफी मिळाली, पण—

टायरोल पूर्ण स्वतंत्र झालें. होफर हा धर्मभीरूपणानें, सचोटीनें राज्यकार्य पाहूं लागला. पण हें अवघे दोन महिने चाललें. कारण तेवढ्या अवधींत नेपोलियनचें अपार सैन्य टायरोलमध्यें शिरलें. "कांहीं झालें तरी टायरोल ऑस्ट्रियांत राहील, तुम्ही झुंज देऊं नका." असा निरोप टायरोलचा स्नेही जो ऑस्ट्रियन बादशहा त्यानें पाठविला. नेपोलियननेंहि घोषणा केली कीं, सर्व बंडखोरांना माफी मिळेल. अर्थात् होफरनें आपल्या सहकाऱ्यांसह माघार घेतली.

## होफरचा अमानुष वध

मनांतून हा पराभव होफरला डिवचीत होता. त्याच्या मनाला स्वस्थता मिळेना. त्याला जेव्हां दिसलें कीं, नेपोलियन नि ऑस्ट्रिया यांच्या युद्धांत ऑस्ट्रियाला विजय मिळण्याचा संभव आहे, तेव्हां तो बेचैन झाला. पुनः आपण उठावणी करावी असें त्याच्या मनानें घेतलें. या दिशेनें त्याचे यत्न चालू असतां फ्रेंचांचें दोस्त जें इटली राष्ट्र, त्या राष्ट्राच्या सैनिकांनीं होफरला कैद केलें ! स्वतः इटलीहि नेपोलियनच्या गुलामगिरींतच होता, परंतु ही स्थिति विसरून नेपोलियनला खुश करण्यासाठीं इटालियनांनीं होफरला निःशस्त्र

केलें. एवढ्यावर ही गोष्ट थांबली नाहीं, तर या देशभक्ताला मांटुआ या गांवीं त्यांनीं गोळी घालून ठार केलें! (इ. स. १८१०)

## समारंभानें दफनविधि

या प्रकाराविरुद्ध जेव्हां टीका सुरू झाली तेव्हां इटालियन अधिकाऱ्यांनीं प्रकट केलें कीं, नेपोलियनची आज्ञा होती म्हणूनच आम्ही होफरला गोळी घातली, वास्तविक तशी आमची इच्छा नव्हती. नेपोलियननें या गोष्टीचा इन्कार केला नि इटालियनांवर दोषारोपण केलें! पण होफर मारला गेला तो या टीकाटिपणीनें थोडाच परत येणार होता! त्याला हौतात्म्याचें मरण आलें नि आजहि टायरोलीजांना तो स्फूर्तिस्थान वाटतो. नेपोलियनचा अवतार संपल्यानंतर इ. स. १८२३ सालीं होफरचें मृत शरीर मांटुआ येथून इन्स्ब्रुक येथें टायरोलीजांनीं आणलें, आणि मोठ्या समारंभानें चर्चमध्यें त्यास पुरण्यांत आलें! ईश्वर त्याच्या आत्म्यास शांति देवो!

*　　*　　*

## फलश्रुति

कै. शिवरामपंत परांजप्यांच्या शब्दांत टायरोलीजांच्या स्वातंत्र्य-युद्धाची फलश्रुति पुढीलप्रमाणें सांगतां येईल:—

" ज्यांचे डोळे मोठ्या राज्यांच्या विशाल वैभवानें आणि अवर्णनीय पराक्रमानें दिपून गेलेले असतील, ज्यांना मोठ्या राजांच्या अफाट सैन्याच्या हल्ल्यापुढें कोणाचाहि टिकाव निघावयाचा नाहीं असें वाटत असेल, ज्यांना सगळें सामर्थ्य राजे, राजांचे सेनापति

आणि त्यांचीं सैन्यें ह्यांच्यामध्येंच भरलेले आहे अशा खोट्या कल्पनेनें घेरलेलें असेल आणि ज्यांना स्वधर्माचीं दृढबंधनें, ईश्वराविषयीं निष्ठा, उद्योगाची निस्सीम प्रीति आणि स्वदेशभक्ति यांच्यामध्यें अतर्क्य सामर्थ्य आहे असें वाटत नसेल आणि म्हणून ज्यांचीं मनें निराशेच्या अंधकारानें व्याप्त झालीं असतील, त्यांनीं पुढें दिलेली टायरोलची हकीगत अवश्य वाचावी ! ”

# टायरोलची स्वातंत्र्य-कथा

## १

## ईश्वराची अगाध कृति

ईश्वराची कृति फार अगाध आहे! सर्व कार्यकारणभाव त्याच्या ठिकाणीं खोटे पडतात. तो कोणाच्या हातून काय करवील याचा कांहीं नियम नाहीं. मोठमोठ्यांच्या हातून ज्या गोष्टी घडून येणें अशक्य असतें, त्या गोष्टी यःकश्चित् क्षुद्र लोकांच्या हातूनहि परमेश्वर कधीं कधीं घडवून आणितो. रोमन लोकांचें साम्राज्य म्हणजे केवढें विस्तृत! पण त्याचा नाश परमेश्वरानें कोणाच्या हातून करविला? तर, रोमन साम्राज्याच्या उत्तरेकडील अरण्यामध्यें राहणाऱ्या निवळ रानटी लोकांच्या हातून! रोमन लोकांना ज्या अनेक कला अवगत होत्या आणि रोमन तत्त्ववेत्त्यांनीं जीं अनेक शास्त्रें लिहिलीं होतीं, त्यांपैकीं एका काडीचेंहि ज्ञान ह्या रानटी लोकांना नव्हतें. तरी पण त्यांनीं रोमन साम्राज्याचे तुकडे तुकडे करून टाकले. अशाच प्रकारचा चमत्कार परमेश्वरानें हिंदुस्थानामध्येंहि घडवून आणलेला आहे. जसें रोमन लोकांचें साम्राज्य पश्चिमेकडे पसरलेलें होतें, तसेंच मोंगल लोकांचें साम्राज्य कांहीं शतकांमागें पूर्वेकडे पसरलेलें होतें. रोमन साम्राज्याप्रमाणें मोंगल साम्राज्यचाहि विस्तार आणि बलाढ्यपणा कल्पनातीत झालेला होता. मोंगलांची मोंगलाई

हिंदुस्थानांतून नाहींशी होईल असें सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत कोणाच्या स्वप्नांतही आलेलें नव्हतें. परंतु अशा प्रकारची अजिंक्य झालेली मोंगलाई कोणाच्या हातून लयास गेली? तर, केवळ सह्य पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतील शेतकरी लोकांच्या हातून त्या अजिंक्य मोंगलाईचा शेवट झाला. ह्यावरून अरण्यांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून राहणाऱ्या रानटी शेतकऱ्यांच्याही अंगामध्यें साम्राज्यांना प्रतिबंध करण्याची शक्ति परमेश्वर कधीं कधीं उत्पन्न करितो असें दिसतें. गेल्या शतकाच्या प्रारंभीं युरोप खंडामध्यें नेपोलियन हा आपलें साम्राज्य चोहोंकडे पसरविण्यासाठीं अत्यंत दीर्घ प्रयत्न करीत होता. त्या प्रसंगीं त्याला टायरोलीज लोकांकडून जो प्रतिबंध करण्यांत आला त्यावरूनहि वरील सिद्धांताचेंच दृढीकरण होतें.

## आशापूर्ण कथा

ज्यांचे डोळे मोठ्या राज्यांच्या विशाल वैभवानें आणि अवर्णनीय पराक्रमानें दिपून गेलेले असतील, ज्यांना मोठ्या राजांच्या अफाट सैन्याच्या हल्लयापुढें कोणाचाहि टिकाव निघावयाचा नाहीं असें वाटत असेल, ज्यांना सगळें सामर्थ्य, राजे, राजांचे सेनापति आणि त्यांचीं सैन्यें ह्यांच्यामध्येंच भरलेलें आहे अशा खोट्या कल्पनेनें घेरलेलें असेल, आणि ज्यांना स्वधर्माचीं दृढबंधनें, ईश्वराविषयीं निष्ठा, उद्योगाची निस्सीम प्रीति आणि स्वदेशभक्ति यांच्यामध्यें अतर्क्य सामर्थ्य आहे असें वाटत नसेल आणि म्हणून ज्यांचीं मनें निराशेच्या अंधकारानें व्याप्त झालीं असतील, त्यांनीं पुढें दिलेली टायरोलची हकीकत अवश्य वाचावी.

## टायरोलमधील अस्वस्थता

टायरोल हा युरोप खंडांतील लहान प्रदेश आहे. ह्याची लांबी-रुंदी सुमारें ११,००० चौरसमैल आहे. हा प्रदेश जर्मनीच्या दक्षिणेस आहे; व ह्याच्यासभोंवतीं बव्हेरिया, स्वित्झर्लंड, इटली वगैरे प्रांत आहेत. हा सर्व प्रदेश अतिशय डोंगराळ आहे. स्वित्झर्लंड-मधील अतिशय उंच जो आल्प्स् पर्वत त्याच्या कित्येक मोठमोठाल्या रांगा ह्या प्रदेशांत पसरलेल्या आहेत; व ह्या पर्वतांच्या रांगांवरून मोठमोठालीं अरण्यें पसरलेलीं आहेत. हा प्रांत प्रथमतः ऑस्ट्रियाच्या ताब्यामध्यें होता. परंतु नेपोलियन बादशहानें आपल्या बाहुबलाच्या जोरावर युरोप खंडांत ज्या अनेक घडामोडी केल्या त्यांमध्यें हा प्रांत इ. स. १८०५ च्या डिसेंबर महिन्यांत प्रेसबर्ग येथें झालेल्या तहानें ऑस्ट्रियाच्या ताब्यांतून काढून बव्हेरियाच्या ताब्यांत देण्यांत आलेला होता. आणि ह्या वेळेपासून टायरोलमधील अस्वस्थतेला सुरुवात झाली.

## परक्यांचें राज्य परंतु—

टायरोलचा प्रदेश पूर्वी ऑस्ट्रियाच्या ताब्यांत होता असें वर सांगितलें आहे. एका देशानें दुसऱ्या देशाच्या ताब्यांत असणें ह्या-बद्दल आपल्या हिंदुस्थानांतील लोकांची स्वानुभवावरून कांहींएक विशेष प्रकारची कल्पना झालेली आहे. परंतु ऑस्ट्रिया आणि टायरोल ह्यांच्या दरम्यान तसा संबंध नव्हता. टायरोलीज लोक नांवाला मात्र ऑस्ट्रियाच्या अमलाखालीं होते. परंतु वास्तविक पाहतां ते पूर्णपणें स्वातंत्र्याचा अनुभव घेत होते. ते आपले प्रतिनिधि निवडीत असत आणि त्यांच्या संमतीवांचून त्यांच्यावर कोणत्याहि कराचा

बोजा लादला जात नसे. त्यांच्या हक्कांची पायमल्ली करण्याचें ऑस्ट्रियाला धारिष्ट कधींहि होत नसे; व ऑस्ट्रियापासून टायरोलीज लोकांचें जें संरक्षण होत असे आणि जे फायदे मिळत असत त्यांवरून मात्र, आपल्यावर ऑस्ट्रियाचें राज्य आहे हें टायरोलच्या लोकांना कळत असे. ह्याशिवाय आपण कोणा परकीयांच्या ताब्यांत आहों असें भासण्याचा त्या सुदैवी लोकांना कधीं प्रसंगच येत नसे.

## सक्तीचें लष्करी शिक्षण

हल्लींचा हिंदुस्थानवरील परकीय अमल आणि त्या वेळचा टायरोलवरील परकीय अमल ह्यांच्यांत सादृश्य शोधूं गेलें असतां सांपडणें कठीण आहे. त्यांच्यावर कर इतके थोडे होते कीं, ते आहेत असेंसुद्धां कोणाला वाटत नव्हतें. बहुतेक मोठमोठ्या जागा तेथील नेटिव लोकांसच मिळत होत्या. शिवाय लष्करी शिक्षणाची बंदी बिलकूल नव्हती. प्रत्येक पुरुष वयांत आला म्हणजे त्यानें निदान बेचाळीस दिवसपर्यंत तरी लष्करी विद्या शिकून घेण्यांत घालविले पाहिजेत असा सक्त नियम होता, व या लष्करी शिक्षणाबद्दल टायरोलिज लोकांनाहि मोठी हौस वाटत असे. ज्या तरुण मुलांवर त्याची पाळी येईल त्यांना आपल्या आयुष्यांतील ते मोठे उत्सवाचे दिवस आहेत असें वाटत असे. टायरोलमधील सर्व पुरुषांची मिलिशियामध्यें भरती केलेली असे व गोळी कशी मारावी वगैरे लष्करी शिक्षणांतील बहुतेक सर्व प्राथमिक गोष्टी त्या लोकांना शिकविलेल्या असत. आणि अशी व्यवस्था असल्यामुळें आपल्या टायरोलच्या सरहद्दीवरील पर्वतांचें संरक्षण करण्याकरितां वीस

हजारांपासून चाळीस हजारांपर्यंत टायरोलीज लोक नेहमीं तयार असत.

## दीर्घोद्योगी शेतकरी

अशा प्रकारच्या राजकीय स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यामध्यें टायरोलीज लोकांच्या कैक पिढ्या गेलेल्या होत्या. हे लोक बहुत-करून शेतकरीच असत. त्यामुळें त्यांच्यामध्यें आपल्याइकडील सह्याद्रीच्या दऱ्यांखोऱ्यांतील मावळे लोकांप्रमाणें एक प्रकारचा राकटपणा आलेला होता. त्यांनीं आपला राष्ट्रीय पोषाख आणि आपल्या जुन्या चाली कधीं टाकून दिल्या नव्हत्या. त्यांची वर्तणूक स्वतंत्रपणाची असे आणि त्यांचा निश्चय ते निर्भयपणानें शेवटास नेत असत. हे लोक फार दिर्घोद्योगी होते. डोंगरांत राहण्याचा प्रसंग असल्यामुळें साहज़िकपणेंच त्यांना कित्येक गोष्टी कराव्या लागत असत. जेथें गुरांना जातां येत नाहीं अशा अडचणींतल्या कडयांतील गवत टायरोलीज शेतकरी आपल्या हातांनीं कापून आणण्याकरितां जात असत. व कित्येक ठिकाणीं एखाद्या दरींतलि जमिनीची लागवड करण्याकरतां आपल्या उंच कड्यावरून डोकीवर टोपली घेऊन दोरीला धरून टायरोलीज शेतकरी आपल्या शेतांमध्यें उतरून जात असत. त्यांच्या कुटुंबांत कोणाला आळशी होतांच येत नसे. लहान मुली आपल्या गाई चारीत असत किंवा त्यांच्यासाठीं रानांतून गवत कापून आणीत असत, आणि लहान मुलगे आपल्या बापाबरोबर शेतांमध्यें काम करीत असत. परंतु इतके श्रम करूनहि तेथील सर्व जमीन डोंगराळ असल्यामुळें टायरोलीज लोकांना

आपल्या उदरनिर्वाहासाठीं आणखीहि कित्येक धंदे करावे लागत असत. त्यामुळें बारीकसारीक प्रकारच्या प्रांतिक कलेमध्यें टायरोलीज़ लोकांची बरीच प्रगति झाली होती. डोंगरांतून लहानमोठे पाण्याचे जे प्रवाह उंच प्रदेशावरून सखल प्रदेशाकडे वाहत जात होते त्यांच्याकडून प्रत्येक घरामध्यें कांहीं तरी काम करून घेतल्यावांचून त्यांना ते पुढेंच जाऊं देत नसत. टायरोलीज लोकांच्या घरांतून साऱ्या दिवस-रात्र राबून पाण्याचे प्रवाह त्यांचें दळण दळून देत असत, आणि त्यांचें तेल काढून देत असत. इतकेंच नव्हे, तर टायरोलीज लोकांचीं लहान मुलें रडूं लागलीं तर त्यांना उगी करण्याकरतां टायरोलमधील स्त्रिया पाण्याच्या प्रवाहांना आपल्या मुलांचे पाळणे हालविण्यालादेखील लावीत असत.

## हाडाचे लढवय्ये

अशा प्रकारच्या स्थितीमध्यें राहणारे लोक स्वतंत्रच असले पाहिजेत. त्यांना लोकांची गुलामगिरी कशी खपणार? अप्रतिबद्ध रीतीनें चोहोंकडे पसरणारे पर्वत, स्वैरगतीनें वाहणाऱ्या नद्या, अव्याहतपणें दाही दिशांनीं संचार करणारा प्रभंजन आणि अनंत विस्ताराचें आकाश, ह्यांच्या सहवासामध्यें नित्य राहणाऱ्या मनुष्याचें मन स्वातंत्र्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही परीस्थितीमध्यें संतुष्ट राहावयाचें नाहीं; व त्याचप्रमाणें टायरोलीज लोकांची स्थिति होती. त्यांना स्वतंत्रतेसारखी प्यारी वस्तु दुसरी कोणतीहि नव्हती. ते लोक मोठे धीट असून हाडाचे लढवय्ये होते. तालीम वगैरे करून त्यांची शरीरें कसलेलीं होतीं. आणि त्यांच्या डोळ्यांमध्यें शूरपणाचें पाणी

3963
आ. वा


एकसारखें खेळत होतें. शस्त्र म्हणजे पुरुषांची एक सहधर्मचारिणीच होय. त्या सहधर्मचारिणीचा आणि टायरोलमधील पुरुषांचा कधींही वियोग झालेला नसे. ते रविवारीं देवळांत गेले तरी त्यांचीं शस्त्रें त्यांच्या कमरेला लटकलेलीं असत. तारकिटावर गोळीबार करण्याची प्रत्येक टायरोलीज मनुष्याला झालेली नेहमींची संवय, आणि अशा रीतीनें संपादिलेल्या गुणाचा उपयोग करण्याची शिकारींच्या प्रसंगीं वरच्यावर प्राप्त होत असलेली संधि, ह्यांच्या योगानें टायरोलचे लोक निशाणी वगैरे मारण्यामध्यें फारच तरबेज झालेले होते. असले लोक स्वाभाविकपणेंच प्रामाणिक, सच्चे, शूर, आणि परोपकारी असतात. आणि त्याप्रमाणें टायरोलीज लोक होते. परंतु त्यांचा कोणी अपमान केला तर त्यांना कधीं सहन होत नसे. ते स्वतंत्र लोक असल्यामुळें आणि स्वतंत्रपणांत वाढले असल्यामुळें आपण सर्व सारखे आहों असें त्यांना वाटत असे. परंतु तसा त्यांना सारखेपणाचा मान कोणीं दिला नाहीं, तर मात्र ती गोष्ट त्यांच्या मनाला अत्यंत झोंबत असे.

## धर्मश्रद्धाळू टायरोलीज

पहाडांतील वस्ती आणि आजन्मसिद्ध स्वतंत्रता ह्यांच्याशिवाय टायरोलच्या लोकांमध्यें पीळदारपणा आणण्याला आणखीहि एक गोष्ट कारणीभूत झालेली होती. टायरोलीज लोकांची धर्मश्रद्धा कांहीं विलक्षण होती. टायरोलच्या पहाडांतून जिकडे पाहावें तिकडे देवळेंच देवळें दिसत असत. जंगलांतील रस्त्यांतूनहि असें एक मैलसुद्धां अंतर सांपडावयाचें नाहीं कीं, जेथें निदान एक तरी देऊळ आसपास

बांधलेलें नाहीं. पर्वताच्या अगम्य शिखरांवर आणि अरण्यांतील खोल दरींत जेथें पहावें तेथें धर्मसंबंधीं अथवा देवाची कांहीं आकृति खोदलेली नाहीं अशी एकही जागा नाहीं. अरण्यांतून शहरांत आलें तरी तेथेंदेखील ह्या धर्मप्रीतीचें प्राबल्य दृग्गोचर होतच असतें. आपल्याइकडे घरांवर ज्याप्रमाणें देवादिकांचीं चित्रें काढण्याची चाल आहे, त्याचप्रमाणें टायरोलमध्येंहि आहे, व त्या देवता सर्व संकटांपासून आपलें संरक्षण करतात असा त्या लोकांचा पूर्ण विश्वास आहे. डोंगरावर सगळी झाडांचीच गर्दी झालेली असते; पण त्यांतूनच एकादें देवळाचें शिखर हळूच वर डोकें काढून टायरोलीज लोकांच्या धर्मश्रद्धेची साक्ष पटवून देत असतें. रविवारच्या दिवशीं सर्व लोकांची देवळामध्यें दाटी होत असते. अशा वेळीं देवळांत जागा न मिळाली तर देवळाबाहेरीलहि गवतावर गुडघे टेकून एकाग्र अंतःकरणानें प्रार्थना करीत असलेले टायरोलीज लोक दृष्टीस पडतात. प्रत्येक कुटुंबांत संध्याकाळच्या वेळीं आपल्या देवाची कोणी प्रार्थना करण्याला टायरोलमध्यें चुकत नाहीं. आणि अशा वेळीं जर कोणी वाटसरू एखाद्या गांवाकडे येऊं लागला तर त्याच्या कानांवर संध्याकाळच्या प्रार्थनेचे मंजुळ स्वर पडून त्याचें चित्त तेथील लोकांपासून पाहुणचार घेण्याच्या आधींच अतिशय संतोषित होतें.

## पारतंत्र्यास आरंभ !

इतकी ज्यांची देवावर श्रद्धा, त्यांना देव पारतंत्र्यांत काय म्हणून ठेवील ? इ. स. १८०५ पर्यंत टायरोलचे लोक आपल्या डोंगरावरील झोपड्यांत, आपल्या धर्मांत आणि आपल्या स्वातंत्र्यांत

सुखानें कालक्रमणा करीत होते. परंतु १८०५ या वर्षाबरोबरच टायरोलच्या लोकांचें सुख अस्तास गेलें. आणि १८०६ या वर्षाच्या जानेवारी महिन्याबरोबर टायरोलच्या दुःखाला आणि गुलामगिरीला सुरुवात झाली. टायरोलचे लोक हे पहाडांत वाढलेले आणि त्यांनीं स्वतंत्रतेचा पूर्णपणें उपभोग घेतलेला. अशा लोकांना चुचकारून, भुलथापा देऊन व देऊं-दिलाऊं करून कसें फसवावें आणि युक्ति-प्रयुक्तीनें त्यांच्या डोळ्यांत धूळ टाकून त्यांच्यावर आपला अमल कसा बसवावा, हे बव्हेरियाला चांगलेंसें माहीत नव्हतें. कदाचित् त्या वेळीं ही विद्या पूर्णत्वाला आलेली नसेल. टायरोलच्या ज्या कांहीं तक्रारी होत्या त्या नुसत्या शक्तीच्या जोरावर जागच्या जागीं दाबून टाकाव्या अशी कुकल्पना बव्हेरियाच्या डोक्यामध्यें येऊं लागली. प्रेसबर्गच्या तहानें जेव्हां टायरोल बव्हेरियाच्या ताब्यांत गेलें तेव्हां टायरोलच्या लोकांचे पूर्वींचे जे जे हक्क असतील ते ते सर्व कायम ठेवले जातील असें बव्हेरियानें वचन दिलेलें होतें. परंतु टायरोलमध्यें बव्हेरियाचा जम बसल्याबरोबर बव्हेरियानें आपला प्रामाणिकपणा टायरोलीज लोकांच्या प्रत्ययास आणून देण्याची सुरवात केली. टायरोल हा दुसऱ्यांचा प्रांत आहे, तो आपल्याकडे फार दिवस टिकावयाचा नाहीं, असें वाटूनच कीं काय कोण जाणे, टायरोलच्या अंगांतून थोडक्या वेळांत जितकें पुष्कळ रक्त पिळून काढतां येईल तितकें काढून घेण्याचा बव्हेरियानें उपक्रम सुरू केला.

## जुलुमांची जाणीव झाली

ज्या कायद्यांप्रमाणें टायरोलची राज्यव्यवस्था शेंकडों वर्षेंपर्यंत

चालली होती, ते सगळे कायदे बव्हेरियाच्या राजानें आपला एक खलिता प्रसिद्ध करून धाब्यावर बसविले, लोकांच्या प्रतिनिधींची जी सभा होती ती बंद करण्यांत आली, अगदीं नवीन असे आठ कर टायरोलच्या लोकांवर बव्हेरियानें बसाविले, आणि त्या करांच्या पैशांची वसुली फार निष्ठुरपणें करण्यांत येऊं लागली. टायरोलमधील पूर्वीच्या शूर पुरुषांनीं केलेल्या शूर पुरुषांचे पोवाडे ज्यांमध्यें गाइले होते अशा प्रकारचीं सर्व पुस्तकें बंद करण्यांत आलीं व टायरोलचे लोक मोठ्या भाविकपणानें ज्या तीर्थयात्रा करावयाला जात असत त्यांनाहि प्रतिबंध झाला. देवस्थानें आणि धर्मार्थ देणग्या खालसा करण्यांत आल्या, आणि देवळांतील सोन्यारुप्याचीं भांडीं आटवून त्यांचा निकाल लावण्यांत आला. टायरोलच्या पूर्वीच्या राजघराण्यांतील ज्या कांहीं अमूल्य जिनसा होत्या त्याहि बाजारांत विक्रीकरितां आल्या. मोठमोठ्या किल्ल्यांमध्यें कांहीं एक आडकाठी उरली नाहीं. तेथील अनेक अदृष्टपूर्व पदार्थ खेंचून बाहेर काढिले. लोकांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर दररोज नवीन नवीन कर बसाविण्यांत येऊं लागले. टायरोलमधील जें कांहीं नाणें हातीं लागलें तें सर्व बव्हेरियाच्या खजिन्यामध्यें पळवून नेण्याची सुरवात झाल्यामुळें टायरोलमध्यें नाण्याची फार टंचाई उडाली. नोटांची किंमत कमी झाली. टायरोल हें जें आपल्या देशाचें नांव टायरोलीज लोकांच्या हजारों वर्षांच्या सहवासानें अत्यंत प्रिय झालेलें होतें तेंहि बदलून टाकण्याचे प्रयत्न चालले होते व तेथील लोकांना सरकारदरबारांतून आपली जन्मभाषा बोलण्यालासुद्धां बहुतेक ठिकाणीं मनाई झालेली होती. अशा प्रकारानें टायरोलीज़ लोकांवर जुलमाची अगदीं शिकस्त होऊन राहिली होती.

च ह्याच्यापलीकडे मनुष्यानें जुलूम सहन करणें शक्यच नाहीं असें त्यांना वाटूं लागलें होतें. वर दिलेल्या अनेक जुलुमांसाठीं टायरोलचे लोक मनामध्यें जळत होतेच, परंतु त्यांना सर्वांत एका गोष्टीचें विशेष वाईट वाटत होतें. जे आपल्यावर जुलूम करतात त्यांच्या सैन्यामध्यें चाकरीला राहून ज्यांना ज्यांना मारण्याकरितां आपल्याला जेथें जेथें नेतील त्यांना त्यांना मारण्याला आपल्याला तेथें तेथें जाणें भाग पडावें, ह्या गोष्टीनें तर टायरोलच्या लोकांचीं मनें बव्हेरियाच्या-विरुद्ध फारच खवळून गेलेलीं होतीं. जुलुमाचे प्रकार सर्व ठिकाणीं सारखेच ! जे जुलूम इतर अनेक लोकांवर झालेले आपण इतिहासांत वाचतों, तेच टायरोलीज लोकांवर चालले होते. पण ते जुलूम आहेत असें त्यांना वाटलें आणि ते त्यांचा प्रतिकार करण्याला उठले, हेंच टायरोलच्या हकीकतीमध्यें काय तें विशेष आहे.

## साडेतीन वर्षांतच प्रतिकार केला !

बव्हेरियाच्या अशा प्रकारच्या जुलमी राज्यपद्धतीपासून आपली सुटका करून घेण्याचा टायरोलीज लोकांनीं निश्चय केला. परंतु बव्हेरियाची शक्ति व त्याला नेपोलियनचें पाठबळ, आणि टायरोलचें क्षुद्र सामर्थ्य ह्यांची तुलना करून पाहिली असतां बव्हेरियाशीं टायरोलनें टक्कर देणें म्हणजे एखाद्या मनुष्यानें मोठ्या थोरल्या दगडावर आपलें डोकें आपटून घेण्यासारखेंच होतें. परंतु ऑस्ट्रियाच्या मदतीनें ही गोष्ट सुकर झाली. टायरोलमध्यें लोकांचा असंतोष दिवसें-दिवस जास्त वाढत चालला होता व त्या असंतोषाचा आपण फायदा घ्यावा ही ऑस्ट्रियाचीही इच्छा होतीच. आणि आपलें बंड परिणामीं

यशस्वी होण्याला आपल्याला ऑस्ट्रियाची मदत मिळाल्यावांचून गत्यंतर नाहीं हें टायरोलचे लोकहि जाणून होते. त्यामुळें टायरोल आणि ऑस्ट्रिया ह्या दोन्ही देशांमध्यें पुढील कृत्यांची तयारी गुप्तपणानें सुरू झाली. इ. स. १८०६ मध्यें टायरोलवरील बव्हेरियाच्या परकीय अमलाला सुरवात झाली होती. पण हा परकीय अमल टायरोलनें अगदीं फारच थोड्या दिवसांमध्यें फेंकून देण्याची तयारी केली. ता. १६ डिसेंबर १८०५ रोजीं प्रेसबर्गच्या तहानें टायरोल बव्हेरियाच्या जबड्यांत पडलें; आणि ता. ८ एप्रिल इ. स. १८०९ रोजीं तो बव्हेरियाचा जबडा फाडून बाहेर पडण्याचा टायरोलनें प्रशंसनीय प्रयत्न केला. पुरीं साडेतीन वर्षेंसुद्धां झालीं नाहींत; इतक्या थोड्या अवधींमध्यें परकीय जुलमाचीं सुखें काय असतात हें उमजून त्याच्या निवारणासाठीं टायरोलनें प्रयत्न केले हें मोठें आश्चर्य आहे.

## आदर्श उदाहरण

असें उदाहरण इतिहासामध्यें क्वचितच सांपडेल. जुलमाचे विस्तवाचे चटके इतक्या थोड्या मुदतींत टायरोलीज लोकांच्या अंगाला बसूं लागून ते असह्यही झाले. यावरून त्यांच्या अंगाची कातडी टोणग्याच्या अंगाप्रमाणें जाडी नसून फार पातळ असली पाहिजे असें दिसतें. असो. अशा रीतीनें परकीय जुलमानें गांजून जाऊन टायरोलच्या लोकांनीं इ. स. १८०९ च्या एप्रिल महिन्यांतील आठव्या तारखेची रात्र ही आपल्या जिवाचा धडा करण्याची वेळ ठरविली !

## : : २ : :

### मनें खवळून गेलीं

टायरोलच्या लोकांनीं आपल्या मानेवर बव्हेरियानें ठेविलेलें जोखड झुगारून देण्याचा निश्चय केला त्या वेळीं त्यांच्या मनाची स्थिति फार विलक्षण झालेली होती. बव्हेरियाचा जुलूम त्या वेळीं पराकाष्ठेला जाऊन पोहोंचला होता. त्यामुळें त्या जुलमाचा अंत केव्हां होईल ह्याची सर्व टायरोलीज लोक मोठ्या उत्कंठेनें वाट पाहत होते. व बव्हेरियाच्याविरुद्ध बंड करण्याविषयीं ऑस्ट्रियाच्या हेरांनीं उत्तेजन दिल्यामुळें टायरोलीज लोकांची उत्कंठा विशेषच वाढली होती. अशा रीतीनें आधिभौतिक कारणांनीं त्या लोकांचीं मनें खवळून गेलेलीं असल्यामुळें आपण जें काम हातीं घेणार आहों त्यामध्यें आपल्याला कित्येक आधिदैविक गोष्टींपासूनही साहाय्य मिळण्याचा संभव आहे, असा त्यांना भरंवसा उत्पन्न होऊं लागला होता.

## धर्मभोळे टायरोलीज

टायरोलीज लोक हे स्वभावतःच थोडेसे धर्मभोळे होते. युरोप खंडांतील कित्येक इतर देशांप्रमाणें त्यांनीं आपला धर्म अद्यापपर्यंत सुधारून घेतलेला नव्हता. टायरोलमध्यें बंड झालें त्या वेळीं तेथील धर्म म्हटला म्हणजे प्रायः रोमन कॅथॉलिक हाच होता. प्रॉटेस्टंट धर्मापेक्षां कॅथॉलिक धर्मामध्यें धर्मभोळेपणा जास्त हें तर उघडच आहे. परंतु टायरोलीज लोकांचा धर्मभोळेपणा कायम राखण्याला थोडाबहुत अंशीं दुसरेंही एक कारण झालें होतें. त्यांच्या देशाच्या परिस्थितीनें त्यांची मनोवृत्ति आधिदैविक चमत्कारांकडे जास्त वळविलेली होती. अतिशय उंच पर्वत, अतिशय घनदाट अरण्यें, अतिशय उंचावरून पडणारे नद्यांचे प्रवाह, अतिशय खोल दऱ्या, अतिशय मोठमोठीं सरोवरें, इत्यादि ह्या सृष्टींतील अद्भुत गोष्टींचा मनुष्याच्या मनावर स्वाभाविकपणेंच कांहीं तरी विशेष परिणाम होतो. ज्या ठिकाणीं फारसें सृष्टिवैभव नाहीं अशा एखाद्या मैदानांत, एखाद्या ओहळाच्या कांठीं, व एखाद्या झाडाच्याखालीं राहणाऱ्या मनुष्याला ईश्वराच्या अस्तित्वाची साक्ष पटविणारी कोणतीहि गोष्ट त्याच्या सन्निध नसल्यामुळें तो कदाचित् नास्तिकहि होऊं शकेल. परंतु आल्प्सूसारख्या पर्वतामध्यें राहणाऱ्या लोकांना नास्तिक होणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यासभोंवतीं पसरलेल्या सृष्टिवैभवामुळें परमेश्वराविषयींची त्यांची आस्तिक्यबुद्धि इतकी वाढते कीं, तिची मजल धर्मभोळेपणापर्यंतहि जाऊन पोहोंचते. अशा प्रकारचा परिणाम टायरोलीज लोकांच्या मनावर फार झालेला होता; व ह्या क्रांतीच्या वेळीं तर तो ठिकठिकाणीं दिसून येत होता.

## महाराष्ट्राप्रमाणें किल्ल्यांच्या रांगा

आपल्या महाराष्ट्र देशामध्यें ईश्वरनिर्मित सह्याद्रीच्या रांगांवर ज्याप्रमाणें मनुष्यनिर्मित अनेक किल्ल्यांच्या रांगा दृष्टोत्पत्तीस येतात त्याचप्रमाणें टायरोलमध्येंहि अनेक किल्ले आहेत. डोंगराचा उंच सुळका, तुटलेला कडा, अगम्य शिखर ह्यांच्यावर किल्ला बांधलेला नाहीं असें ठिकाण टायरोलमध्यें क्वचितच सांपडेल. कोठें दाट झाडींतून किल्ल्याची तटबंदी वर डोकें काढीत असलेली दिसते; कोठें आपल्याजवळून वाहत जात असलेल्या नदीच्या शांत पात्रामध्यें किल्ल्यांच्या बुरुजांचीं प्रतिबिंबें पडलेलीं दिसतात; आणि कोठें शत्रूच्या सैन्याप्रमाणें सोसाट्यानें वाहणाऱ्या वाऱ्याबरोबर आणि जोरानें येणाऱ्या पावसाबरोबर अनेक वर्षें झगडत असतांहि अभेद्य राहिलेल्या भिंती दृग्गोचर होतात. ह्या किल्ल्यांतून पूर्वीं टायरोलमधील मोठमोठे शूर सरदार राहत असत. परंतु ते सर्व मरून जाऊन व त्यांचें सर्व वैभव नष्ट होऊन इ. स. १८०९ मध्यें जेव्हां टायरोलीज लोकांनीं बंडाचा उपक्रम केला, त्या वेळीं आपल्या महाराष्ट्रांतील हल्लींच्या अनेक किल्ल्यांप्रमाणेंच तेथील किल्ले अगदीं ओसाड पडलेले होते. कैक शतकेंपर्यंत त्यांच्यामध्यें माणसांची वस्ती नव्हती. तरीपण टायरोलीज लोकांनीं बंडाला प्रारंभ केला त्या वेळीं पर्वत, डोंगर, नद्या, खोरीं, वृक्ष, पाषाण, किल्ले, बुरूज, देव, देवळें, आकाश, पृथ्वी—सर्व कांहीं आपल्याला अनुकूल झालेले आहेत, आपल्यावर त्यांची कृपादृष्टि आहे, आपल्याला ते उत्तेजन देत आहेत, आणि त्या जोखमीच्या कामांत आपल्याला मदत करीत आहेत, असा त्यांच्या मनाचा ग्रह होऊन गेलेला होता. त्यामुळें

अनेक वर्षांचे ओसाड किल्ले पण त्यांमधून टायरोलीज लोकांना दिवे लागलेले आहेत असें दिसूं लागलें; व त्यांतून लोक जात येत आहेत असा भास होऊं लागला. त्या किल्ल्यांतील मोठमोठ्या दिवाणखान्यांतून पूर्वींच्या पराक्रमी पुरुषांचीं चिलखतें आणि शिरस्त्राणें खुंटीला टांगलेलीं असत, तींहि त्या वेळीं हालूं लागलीं होतीं. व पूर्वींचे मेलेले योद्धेहि आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्यें आपल्या बाजूनें लढावयाकरितां येत आहेत अशी टायरोलीज लोकांची कल्पना होऊन गेलेली होती.

## साधुसंतांची कृपा

पण नुसते मेलेले योद्धेहि आपलीं चिलखतें अंगांत घालून आपल्या मदतीला येत आहेत इतकेंच नव्हे, तर मेलेले साधुसंतहि आपल्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नावर कृपामृतकटाक्षांचा वर्षाव करीत आहेत, अशीहि टायरोलीज लोकांची दृढ कल्पना होऊन गेलेली होती. जेथें मनुष्याचें कधीं वारेंही लागावयाचें नाहीं, अशा डोंगरांतील अगम्य आणि एकांत ठिकाणीं पूर्वीं साधुसंत जाऊन राहिलेले होते. अशा एखाद्या ठिकाणावरून साऱ्या दिवसभर आपल्या शेतांत काम करून संध्याकाळच्या प्रहरीं आपला नांगर खांद्यावर टाकून व आपल्या बैलांना पुढें घालून एखादा टायरोलीज शेतकरी आपल्या घराकडे हळूहळू जात असतांना कांहीं विलक्षण चमत्कार त्याच्या दृष्टीस पडत असत. आणि ते तो घरीं येऊन आपल्या बायकामुलांना आणि स्नेह्यासोबत्यांना सांगत असे. अमक्या अमक्या साधूंना मरून आज शेंकडों वर्षें झालीं आहेत तरी पण टायरोलच्या स्वतंत्रतेसाठीं

गुडघे टेकून देवाची प्रार्थना करीत असतांना आणि टायरोलच्या गांजलेल्या लोकांसाठीं देवाची करुणा भाकीत असतांना मीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें; अशा प्रकारच्या गोष्टी टायरोलचे शेतकरी आपल्या आगटीच्याभोंवतीं शेकत बसलेले असतांना, थोड्याथोडक्या वेळां चालत असें नाहीं. टायरोलीज शेतकरी आपल्या पोटाच्या धंद्यासाठीं सारा दिवसभर डोंगरांतून कोठेंतरी असत. अशा प्रसंगीं एखादे वेळीं ज़र तेथें मोठें वादळ उद्भवलें तर त्यापासून आपलें संरक्षण करून घेण्यासाठीं आसपासच्या एखाद्या देवळामध्यें ते जात. त्या वेळीं तेथील येशु ख्रिस्ताच्या क्रॉसचें डोकें लोकांना होत असलेल्या दु:खामुळें खालीं वांकलेलें त्यांच्या नजरेस पडे, आणि त्याच्याहिपेक्षां उंच उंच पर्वतांच्या शिखरांवर जीं देवळें होतीं त्या देवळांतून; जेथें एकहि मनुष्य अशा वेळीं जाणें शक्य नाहीं त्या ठिकाणीं, कैक मंजुळ वाद्यांचे ध्वनि निघत असलेले आणि हजारों लोकांचे एक-मेकांमध्यें संमिश्र झालेले आवाज टायरोलच्या स्वतंत्रतेसाठीं परमेश्वराची उच्च स्वरानें प्रार्थना करीत असलेले टायरोलच्या लोकांनीं अनेक वेळां ऐकलेले आहेत.

## वाळलेलीं फुलें टवटवीत होत

संध्याकाळच्या प्रहरीं फारसा प्रकाश उरलेला नाहीं, पण फारसा काळोख पडलेला आहे असेंहि नाहीं, अशा प्रसंगीं, उंच पर्वतांच्या शिखरांवरून शिपाई, घोडेस्वार आणि तोफखाना हे आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईतील मदतीकरितां कूच करून येत असलेले टायरोलच्या लोकांना दिसत असत व गाड्यांच्या

चाकांचा खडखडाट, घोड्यांच्या टापा, सैन्यांतील शिपायांच्या पावलांचा धबधब वाजणारा आवाज, आणि जयाच्या व आनंदाच्या आरोळ्या टायरोलच्या लोकांना स्पष्टपणें ऐकूं येत असत. टायरोल-मधील कित्येक किल्ल्यांवर टायरोलचीं निशाणें आगीसारखीं लाल अशीं रात्रीच्या काळोखांतून फडकत असलेलीं कैक लोकांनीं पाहिलीं होतीं व विजयश्रीनें धुंद होऊन निशाणें उडवीत पर्वताच्या शिखरा-वरून चाललेल्या सैन्यांचीं प्रतिबिंबें आपल्या घराजवळील सरोवरां-मधून टायरोलीज लोकांच्या कैक वेळां दृष्टीस पडत. पूर्वीच्या लढायांतून मरण पावलेल्या वीरांच्या विधवा स्त्रिया आणि अनाथ अर्भकें मृत मनुष्यांच्या प्रीत्यर्थ आपल्या देवाच्या गळ्यांत, टायरोल-मधील कॅथॉलिक धर्माच्या चालीप्रमाणें, फुलांचे हार घालीत असत. हे हार त्या देवांच्या गळ्यांत कायमच असत; परंतु कैक वर्षें लोटल्यामुळें ते हार अगदीं वाळून गेलेले होते. पण असें सांगतात कीं, जेव्हां ही स्वतंत्रतेची लढाई टायरोलमध्यें सुरू व्हावयाची होती, तेव्हां आपल्या वंशजांना—आपल्या मुलांना, आपल्या भावांना, आपल्या नातवांना—आतां लौकरच स्वातंत्र्य मिळणार ह्या आनंदानें त्या वाळून गेलेल्या हारांतील फुलें फिरून टवटवीत होऊन तीं आपला परिमळ सर्व दिशांनीं पसरूं लागलेलीं पुष्कळ टायरोलीज लोकांच्या निदर्शनास आलेलीं होतीं. तसेंच, पुढें सुरू झालेल्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्यें टायरोलच्या पक्षाला एखादे प्रसंगीं अपयश आलें तर टायरोलमध्यें मेलेल्या साधुसंतांच्या ज्या अनेक मूर्ति आहेत त्यांच्या डोळ्यांतून टिपें गळत असत आणि त्यांच्या गळ्यांत अगदीं ताज्या फुलांच्या माळा नेऊन घातल्या तरी त्या एका क्षणामध्यें करपून जात असत.

## इशाऱ्यासाठीं जशा चपात्या तसा भुसा आणि निशाणें

अशा प्रकारची टायरोलीज लोकांच्या मनाची विलक्षण स्थिति होऊन गेलेली होती. त्यांच्याच मनांत स्वतंत्रतेचें वारें शिरलें होतें असें नाहीं, तर पडके किल्ले, जुनीं चिलखतें, मेलेले साधुसंत, देवांच्या प्रतिमा, भजनाचीं मंदिरें, येशूचा क्रॉस आणि परलोकीं गेलेले पूर्वज ह्या सगळ्यांच्या मनांतून आपल्याला स्वतंत्र करून सोडावयाचें आहे, ते आपल्या खुणांनीं आपल्याला स्वतंत्रतेकडे बोलावीत आहेत, बोटानें आपल्याला स्वतंत्रता दाखवीत आहेत, आपल्याला मदत करण्याला येत आहेत व आपल्याला पूर्वलक्षणांनीं आणि शुभसूचक निमित्तांनीं जास्त हुरूप आणीत आहेत, असा टायरोलीज लोकांच्या मनाचा ग्रह झालेला होता. त्यामुळें त्यांच्या अंतःकरणांमध्यें जास्त स्फुरण आणि त्यांच्या मनगटांमध्यें जास्त बळ उत्पन्न झालें व त्यांनीं इ. स. १८०९ च्या एप्रिल महिन्यांत ८ व्या तारखेच्या रात्रीं त्या स्फूर्तीचा आणि त्या बळाचा आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकडे योग्य उपयोग करून घेण्याचा उपक्रम सुरू केला. हिंदुस्थानांत १८५७ सालीं चपात्या ही जशी बंडाची खूण होती त्याप्रमाणें टायरोलमध्येंहि बंड सुरू करण्याची इशारत सर्वांना कळण्याची एक योजना केलेली होती. इन ह्या नांवाची एक नदी टायरोल देशामधून वाहत जात आहे. तिच्या उगमापाशीं करवतलेल्या लाकडांचा भुसा पाण्यांत टाकण्यांत आला व तो जसजसा खालीं वाहत गेला तसतशी सर्व लोकांना फार थोड्या वेळामध्यें क्रांतीबद्दलची बातमी कळत गेली. शिवाय एका फळीवर एक निशाण उभें करून तेंहीं खूण म्हणून नदीमध्यें वाहत सोडलें होतें. परंतु एवढ्यानें ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध

होणार नाहीं म्हणून शेंकडों टेकड्यांवरून मोठमोठे जाळ पेटविण्यांत आले होते. शिवाय, कित्येक ठिकाणीं बायका आणि मुलें कागदाचे लहान लहान चेंडू घरोघर वांटीत फिरत होतीं. त्या चेंडूंवर 'वेळ आली' अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं. त्यावरूनहि पुष्कळांना इशारत मिळाली. अशा रीतीनें टायरोलमधील सर्व लोकांना ही बातमी कळून सर्व लोक खांद्यांवर बंदुका टाकून एकाच वेळीं आपल्या घरांतून बाहेर पडले व एका दरींतील लोक दुसऱ्या दरींतील लोकांशीं, दुसऱ्यांतील तिसऱ्या दरींतील लोकांशीं, अशा रीतीनें सर्व लोक एकत्र होतां होतां निरनिराळ्या दऱ्यांतून वाहत येणाऱ्या लहान लहान ओढ्यांचें पाणी एकत्र होऊन त्यांची एक मोठी विस्तीर्ण नदी बनून ज्याप्रमाणें मैदानावर येते, त्याप्रमाणें हे टायरोलीज लोकांचें सैन्य मैदानावर येऊन तयार झालें.

## हें युद्ध म्हणजे जगाचा निरोप !

आपण हातीं घेतलेलें कृत्य किती कठिण आहे ह्याची टायरोलीज लोकांना कल्पना नव्हती असें नाहीं. नेपोलियनचा पराक्रम यांना माहीत होता. नेपोलियननें इजिप्त, ऑस्ट्रिया, इटली, व्हेनिस, स्वित्झर्लंड, स्पेन, इत्यादि ठिकाणच्या लोकांना जिंकून त्यांची काय दशा करून टाकली आहे हें सर्व टायरोलीज लोकांच्या डोळ्यांपुढें स्पष्ट दिसत होतें. अशा प्रकारच्या नेपोलियनची बव्हेरियाला पूर्ण मदत आणि त्या बव्हेरियाच्याविरुद्ध आपण लढाई करावयाची आणि त्याच्या जुलमापासून आपण स्वतंत्र व्हावयाचें, ही गोष्ट किती दुरापास्त आहे, याची बरोबर कल्पना टायरोलीज लोकांना होती.

तरी पण ह्या सगळ्या गोष्टी तुच्छ मानून टायरोलच्या लोकांनीं आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं पराक्रम करण्याकरितां कंबर बांधली होती. शत्रूचें सैन्य कवाईत शिकलेलें आहे आणि आपल्याला लष्करी शिक्षणाचा गंधहि नाहीं आणि शत्रूच्या अफाट सैन्यानें नुसता आपल्याला वेढा दिला तरी देखील आपलें बाहेरचें दळणवळण बंद होऊन आपण कोंडले जाऊं, ह्या गोष्टी त्यांना कळत नव्हत्या असें नाहीं. तरी पण सर्व लोकांनीं एकदिलानें लढण्याचा निश्चय केला आणि वर निर्दिष्ट केलेल्या दिवशीं सर्व जण आपल्या घरांतून बाहेर पडले. आपण ह्या लढाईतून जगून परत घरीं येऊं अशी कोणालाच आशा नव्हती. ह्यास्तव आतां ही आपली शेवटलीच भेट होय असें म्हणून प्रत्येकानें आपल्या कुटुंबांतील माणसांचा आणि स्नेही मंडळींचा मोठ्या सद्‌गदित अंतःकरणानें निरोप घेतला. टायरोलीज लोक जे लढाईला बाहेर पडत होते ते दुसऱ्याचें स्वातंत्र्य बुडविण्याकरितां किंवा दुसऱ्याचे गळे कापण्याकरितां बाहेर पडत नव्हते. आपण आपलें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां, आपण धर्मयुद्ध करण्याकरितां, आपण मनुष्याच्या आयुष्यांतील अत्यंत पवित्र कर्तव्य करण्याकरितां, बाहेर पडत आहों अशी टायरोलीज लोकांची बुद्धि होती. ह्यासाठीं त्यांनीं आपल्याला यश येण्यासाठीं त्यांच्या धर्मानें जे जे विधि सांगितले होते ते ते सर्व यथासांग रीतीनें आणि मोठ्या भक्तीनें केले. टायरोलमधील ख्रिस्ती उपाध्यायांनीं आपापल्या खेड्यांतील जे लोक लढाईवर जावयाचे होते त्या सर्वांना आपल्या देवळांमध्यें एकत्र बोलावून त्यांना उत्तेजन येईल अशा प्रकारचा पुष्कळ उपदेश केला व आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं जे कोणी मरतील त्यांच्यावर

परमेश्वराची कृपा होऊन ते मुक्त होतील, असेंहि त्यांनीं त्यांना सांगितलें. प्रत्येक कुटुंबांतील माणसें एकत्र जमून त्यांनीं परमेश्वरापाशीं अशी प्रार्थना केली कीं, आमच्या कुटुंबांतील जो इसम लढाईला जात आहे तो युद्धाच्या कामांत अपरिचित असल्यामुळें व त्याचे शत्रु फार बलाढ्य असल्यामुळें लढाईत त्याच्यावर अनेक बिकट प्रसंग गुदरतील; अशा प्रसंगीं तो मेला तरी हरकत नाहीं, परंतु आपल्या जन्मभूमीच्या नांवाला कलंक लागण्यासारखें कृत्य त्याच्या हातून कधींहि न घडेल अशा प्रकारचें धैर्य, हे परमेश्वरा, तूं त्याला सदोदित दे. आपल्यांत जशी कित्येक प्रसंगीं जिवंतपणींच श्राद्ध करण्याची चाल आहे त्याप्रमाणें टायरोलीज लोक लढाईवर जावयाला निघाले त्या वेळीं हे आतां जिवंत घरीं यावयाचे नाहींत म्हणून त्यांपैकीं कित्येकांचे ख्रिस्ती धर्माप्रमाणें अंत्यविधिहि करण्यांत आलेले होते. सारांश काय कीं, टायरोलीज लोक इतके जिवावर उदार होऊन निघाले होते. आपण आज मेलेलेच आहों, विजय मिळवून सुरक्षित आलों तर मात्र आपण जिवंत, अशा प्रकारची कडकडीत वृत्ति टायरोलीज लोकांच्या मनामध्यें बाणून गेली होती. त्यांची आपले देवावर अत्यंत निष्ठा होती आणि आपल्या धर्मावर फार श्रद्धा होती. त्यामुळें आपल्या देशाबद्दल आपल्या हातून कांहीं तरी सेवा होईल अशी त्यांना खात्री वाटून ते घरांतून बाहेर पडले होते.

## धारकऱ्यांचा सन्मान

टायरोलचे शिपाई आपल्या घरांतून बाहेर पडून एकत्र जमून चालूं लागले त्या वेळीं टायरोलमधील यच्चयावत् सर्व लोकांना अत्या-

नंदाचें भरतें आलें. व आपल्याइकडे कोणी तीर्थयात्रेला निघाले म्हणजे बाकीच्या लोकांनीं त्यांना पोहोंचविण्याला जाण्याची जी चाल होती, त्याप्रमाणें टायरोलमधील बायकामुलें, अंधपंगु, रोगीआजारी, बालवृद्ध, वगैरे मागें घरीं राहणारे सर्व प्रकारचे लोक आपल्या शूर शिपायांना पोहोंचविण्याकरितां आले होते. कारण ते टायरोलीज शिपाईहि एक प्रकारच्या यात्रेलाच निघालेले होते. ते धारातीर्थाच्या यात्रेकरितां घरांतून बाहेर पडले होते. आणि धारातीर्थाचा पावनपणा इतर तीर्थांपेक्षां फारच मोठा आहे. ह्या धारातीर्थामध्यें ज्याचा देह पतन पावला त्याला पुनर्जन्म नाहीं. त्यांच्या आत्म्याला तात्कालिक मुक्ति प्राप्त होते. अशा या धारातीर्थाच्या यात्रेकरूंना पाहण्यासाठीं आणि निरोप देण्यासाठीं अनेक लोक एकत्र जमा झाले होते. त्या वेळचा देखावा फारच हृदयद्रावक होता. 'हे पहा कसे लढाईवर चालले आहेत!' असें आपल्या मुलांना दाखविण्याकरितां त्यांना कडेवर घेऊन आया घरांतून बाहेर आल्या होत्या. डोळे गेल्यामुळें ज्यांना कांहीं दिसत नव्हतें आणि वार्धक्यामुळें ज्यांना जाग्यावरून हालवत नव्हतें असे कित्येक अंध म्हातारे आपल्या झोंपडींतील अंथरुणावरून उठून बाहेर आलेले होते; व त्यांना डोळ्यांनीं ज़री कांहीं दिसत नव्हतें तरी कानांनीं त्या शूर शिपायांचे जेवढे शब्द ऐकूं येतील तेवढे ऐकून 'तुम्हांला लढाईमध्यें भगवान् यशस्वी करो' असे आशीर्वाद ते देत होते. व कित्येकांना तर ह्या आपल्या लढाईवर जाणाऱ्या देशबांधवांकरितां आपण काय करावें आणि काय न करावें हें कांहींच कळेनासें झालें. ज्यांना दुसरें कांहीं करतां येत नव्हतें ते त्यांचा निदान आपल्याला स्पर्श तरी व्हावा म्हणजे आपण

पुनीत होऊं असें मानून त्यांनीं त्यांच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्यांना त्यांच्या शरीराचा स्पर्श घडला नाहीं त्यांनीं त्यांच्या वस्त्रांना स्पर्श करून आपली तृप्ति करून घेतली. आणि कित्येकांनीं तर ते ज्या घोड्यांवर बसून चाललेले होते त्यांचेंहि चुंबन घेतलें. इतकी स्वदेशभक्तीची लाट त्या वेळीं टायरोलमध्यें उंच उसळली होती !

## मुख्य पुढारी—अँड्र्यू होफर

हें जें टायरोलीज शेतकऱ्यांचें सैन्य तयार झालें होतें, त्यांतील शिपाई जसे लढाईंत फारसे वाकबगार नव्हते, त्याचप्रमाणें त्यांचे सेनापतिहि नव्हते. तरी पण त्या सैन्याचें पुढारीपण ज्यांच्याकडे आलें होतें त्यांच्या अंगीं जे दुसरे अनेक उत्कृष्ट गुण होते त्यांच्या योगानें त्यांनीं हातीं घेतलेलें काम चांगल्या रीतीनें शेवटास गेलें. अँड्र्यू होफर हा टायरोलचा मुख्य पुढारी होता. त्याचा धंदा खाणावळवाल्याचा होता. त्यामुळें सहज रीतीनेंच त्याचा पुष्कळ लोकांशीं परिचय झालेला होता. जेव्हां बंडाचा प्रादुर्भाव झाला तेव्हां त्याचें वय बेचाळीस वर्षांचें होतें. त्याच्या शरीराचा बांधा धिप्पाड होता, छाती रुंद होती, आणि शक्ति विलक्षण होती. परंतु त्याला नेहमीं डोंगर चढण्याचा प्रसंग असल्यामुळें व डोंगर चढतांना थोडेंसें तरी ओणवें होणें जरूर असल्यामुळें त्याच्या शरीराची काठी थोडीशी वांकलेली होती. तो फार विद्वान् होता असें नाहीं, परंतु प्रवासाच्या योगानें त्याच्या अंगांत चातुर्य आलेलें होतें. त्याचा पोषाख अगदीं साधा असे, परंतु त्याची वर्तणूक फार प्रामाणिक-

पणाची असे. त्याची मनोवृत्ति अगदीं निर्लोभपणाची होती. तो खरा कळकळीचा, विश्वासू, जुन्या चालीरीति धरून चालणारा, स्वभावानें उदात्त, धर्मशील आणि अत्यंत स्वदेशभक्त असून आपल्या धर्माच्या आणि देशाच्या प्रीत्यर्थ आपल्या शरीरांतील रक्ताचा प्रत्येक बिंदु अर्पण करण्याला तो सिद्ध होता. त्याचें मन एखादी गोष्ट करण्याला फार लवकर खवळत असे. परंतु त्यांतील कठोरपणा पाहून त्याचें मन एकदम कळवळत असे, इतका तो मनाचा कोंवळा होता. त्याची कॅथॉलिक धर्मावरील प्रीति आणि आपल्या टायरोल देशावरील भक्ति ह्यांना मर्यादा कशी ती ठाऊकच नव्हती. आणि टायरोलमधील पूर्वीचें वैभव किंवा टायरोलमधील पूर्वींच्या पराक्रमी पुरुषांनीं मिळविलेले विजय, असल्या प्रकारच्या विषयांची गोष्ट निघाल्याबरोबर होफरचे डोळे पाण्यानें भरून येत असत.

## स्पेक्‌बेचर आणि जोसेफ हॅस्पिंजर

टायरोलीज लोकांचा दुसरा पुढारी म्हटला म्हणजे स्पेक्‌बेचर हा होय. त्याचें लहानपणचें सर्व वय टायरोलच्या डोंगरांतून शिकार करण्यांत गेलेलें होतें; व त्यामुळें त्याला डोंगरांतील वाटांची वगैरे जी माहिती झालेली होती, तिचा पुढें लढाईच्या वेळीं त्याला फार उपयोग झाला. ह्याचीहि विद्वत्ता बेताबाताची होती. परंतु बव्हेरियाचा द्वेष मात्र ह्याच्या घराण्यामध्यें पिढिजात चालत आलेला होता. ह्याचा आजा बव्हेरियाविरुद्ध चाललेल्या एका लढाईमध्यें होता. तो आपल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगत असतां 'अशी लढण्याची संधि मला केव्हां येईल!' अशा प्रकारचे विचार त्याचा नातू स्पेक्‌बेचर ह्याच्या मना-

मध्यें लहानपणींही घोळत असत. टायरोलचें बंड सुरू झालें त्या वेळीं त्याचें वय सुमारें चाळीस वर्षांचें होतें. तिसरा पुढारी जोसेफ हॅस्पिंजर. हा एक ख्रिस्ती धर्मोपदेशक होता. व लढाई सुरू होईपर्यंत हा आपल्या मठामध्यें पडून होता. त्या वेळीं टायरोलच्या लढाईंत ह्याचा कांहीं उपयोग होईल असें कोणाच्या स्वप्नींही आलेलें नव्हतें. परंतु लढाई सुरू झाल्याबरोबर तो मठांतील जपजाप्यामधून बाहेर निघाला. ह्याचा क्रॉस हेंच ह्याच्या हातांतील शस्त्र होतें. त्या शस्त्रानें तो कधीं कधीं शत्रूवर प्रहार करीत असे. परंतु त्याची मुख्य कर्तबगारी म्हटली म्हणजे सैन्यांतील शिपायांचें जेथें धैर्य खचत असेल तेथें त्यांना उत्तेजन द्यावयाचें व त्यांना शत्रूचा पाडाव करण्याकरितां रणाच्या अग्रभागीं घेऊन ज़ावयाचें, ही होती; व ती कामगिरी त्यानें अनेक वेळां फार उत्तम रीतीनें बजाविली. अशा प्रकारें स्वतंत्रतेच्या प्रबल इच्छेनें जोसेफ हॅस्पिंजरसारख्या केवळ धर्मकृत्यांमध्यें आयुष्य घालविणाऱ्या मनुष्याच्या अंतःकरणामध्येंखुद्धां पूर्णपणें संचार केलेला होता. आणि त्यामुळेंच टायरोलच्या लोकांना यश आलें. अशा प्रकारच्या पुढाऱ्यांच्या निशाणाखालीं आपल्या देशाची स्वतंत्रता परत मिळविण्याकरितां टायरोलचे सर्व लोक इ. स. १८०९ च्या एप्रिल महिन्याच्या ८ व्या तारखेला एकत्र होऊन शत्रूवर चाल करण्याकरितां बाहेर पडले.

:: ३ ::

## आठ दिवसांत स्वतंत्रता

टायरोलच्या इतिहासामध्यें सर्वच गोष्टी विलक्षण आहेत. टायरोलीजना परकीय अमलाचा कंटाळा अगदीं थोड्या दिवसांमध्यें आला, परंतु ह्याच्यापेक्षां जास्त आश्चर्याची गोष्ट हीच आहे कीं, स्वातंत्र्याच्या लढाईला सुरुवात केल्यापासून सुमारें आठ दिवसांच्याआंतच त्यांनीं आपला सर्व देश स्वतंत्र करून सोडला ! त्यांनीं तारीख ८ एप्रिल रोजीं राज्यक्रांतीला सुरुवात केली. आणि १६ तारखेच्या आंतच टायरोलमधील सर्व मुख्य मुख्य ठिकाणांतून फ्रान्सच्या व बव्हेरियाच्या सैन्याला त्यांनीं हांकलून लाविलें व सर्व देश आपल्या हस्तगत करून घेतला. आठ दिवसांमध्यें शत्रूच्या सैन्याची वाताहत करून आपल्या देशाचें स्वातंत्र्य शत्रूपासून परत मिळवून घेतल्याचें उदाहरण इतिहासामध्यें दुसऱ्या कोठें सांपडणें अशक्य आहे. व हा प्रकार टायरोलच्या इतिहासामध्यें वाचला म्हणजे ही अद्भुत गोष्ट

टायरोलीज लोकांनीं कशी केली असेल याच्याबद्दल प्रत्येकाचें मन आश्चर्यानें थक्क होऊन गेल्यावांचून राहणार नाहीं. एखाद्या विस्तीर्ण देशामध्यें अशा गोष्टी इतक्या लवकर घडून येणें अगदीं असंभाव्य आहे खरें. परंतु टायरोलचा प्रदेश अगदीं लहान असल्यामुळें व तेथील नैसर्गिक परिस्थिति स्वसंरक्षणाच्या लढाईला अनुकूल असल्यामुळें इतरांना जी गोष्ट दुरापास्त वाटते ती टायरोलच्या लोकांनीं सहज घडवून आणिली. सभोंवतालच्या डोंगराळ प्रदेशामुळें टायरोलीज लोकांना पुष्कळ मदत झाली खरी; तरी पण त्यांच्या डोंगराळ प्रदेशापेक्षां त्यांचीं डोंगराळ अंतःकरणें आणि डोंगराळ शरीरें हीं युद्धप्रसंगीं त्यांच्या जास्त उपयोगास आलीं. सर्वांमधील ऐक्यभाव, स्वधर्मावर पूर्ण निष्ठा, परकीय अमलाच्या ज्वाळांनीं भाजलेलीं घरेंदारें, आटोपसर आणि लहानसा देश, ईश्वरनिर्मित डोंगरांची तटबंदी, ऑस्ट्रियाची मदत आणि स्वदेशासाठीं प्राणहि देण्याबद्दलचा टायरोलच्या लोकांचा दृढनिश्चय—या सगळ्या गोष्टी एक होऊन त्यांनीं टायरोलला आठ दिवसांच्या अवकाशांत स्वतंत्रतेच्या मंदिरामध्यें नेऊन बसविलें. ह्या आठ दिवसांमध्यें चार-पांच फार मोठमोठ्या लढाया झाल्या, परंतु त्या सर्वांमध्यें टायरोलच्या शेतकऱ्यांनाच यश आलें. स्टराझिंगर, इन्स्रुक आणि हॉल ह्या ठिकाणचे संग्राम फारच भयंकर झाले. ह्या आठ दिवसांच्या लढाईमध्यें अनेक चमत्कारिक गोष्टी घडून आलेल्या आहेत.

## दैवी साह्यही मिळालें

डीटफर्थ ह्या नांवाचा एक बव्हेरियन कर्नल होता. त्याच्यापासून

टायरोलीज लोकांना अत्यंत त्रास झाला होता. त्याची खाजगी वागणूक फार बदमाषपणाची होती, आणि त्याचें सरकारी हुद्द्या-संबंधाचें वर्तन फार कडकपणाचें होतें. त्यामुळें तो लोकांना अतिशय अप्रिय झालेला होता. तो अधिकारावर होता तेव्हां त्याचे डोळे धुंद झालेले होते. पण ती त्याच्या डोळ्यांवरील धुंदी लवकरच उतरली. इन्स्प्रुकच्या लढाईमध्यें त्याला जखम लागून तो घायाळ होऊन टायरोलीज शेतकऱ्यांच्या हातीं सांपडला. त्याच्या अंगांतून अतिशय रक्त गेल्यामुळें तो अर्धवट बेशुद्धहि झाला होता. त्या बेशुद्धीमध्यें त्यानें आपल्याजवळच्या टायरोलीज लोकांना "ह्या लढाईत तुमचा पुढारी कोण होता?" असा प्रश्न केला. त्या वेळीं ते म्हणाले कीं, "आमचा पुढारी कोणी नव्हता. आमचा देव आणि आमचा देश ह्यांच्याकरितां आम्ही सारखेच लढत होतों." हें उत्तर ऐकून डीटफर्थला फारच आश्चर्य वाटलें, व तो म्हणाला, "तुम्हांला पुढारी नव्हता असें कसें म्हणतां? कारण मीं तर त्याला एका पांढऱ्या शुभ्र घोड्यावर बसून माझ्या जवळून जातांना पाहिलें असें मला वाटतें." हे त्याचे शब्द ऐकून टायरोलीज लोकांच्या मनावर फारच विलक्षण परिणाम झाला. जो पांढऱ्या घोड्यावर बसलेला डीटफर्थ-च्या दृष्टीस पडला तो आपल्या सैन्यांचें आणि स्वातंत्र्याचें संरक्षण करणारा साधुपुरुष प्रत्यक्ष सेंट जेम्सच असला पाहिजे अशी टाय-रोलीज लोकांच्या मनाची पक्की खात्री झाली. आणि त्यामुळें आपल्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्यें आपल्याला साहाय्य करण्याला प्रत्यक्ष सेंट जेम्स येत आहे ही गोष्ट कळल्यानंतर टायरोलीज लोकांना लढण्याला विशेषच स्फुरण चढलें. भाविक लोकांच्यासाठीं देव किंवा देवांचेच

अवतार जे साधुपुरुष ते काय करणार नाहींत? ज्या देवानें आपल्या भक्तांसाठीं महाराचें रूप धारण केलें, शेले विणण्याचें काम केलें, किंवा बागेंतील भाजी उपटून तिच्या गड्डया बांधल्या, त्या देवाला त्याचे भक्त स्वातंत्र्यासाठीं युद्ध करण्याला प्रवृत्त झाले असतां त्यांना मदत करण्यासाठीं घोडयावर आरूढ होऊन समरांगणामध्यें येणें अशक्य आहे काय ?

## स्त्रियाहि सहभागी झाल्या

अशा रीतीनें ह्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्यें टायरोलिज लोकांना दैविक साहाय्य मिळाल्यानंतर मग मानवी स्फूर्तीला काय तोटा आहे ? ज्या ठिकाणीं शौर्य दिसण्याचा एरव्हीं बिलकूल संभव नाहीं, त्या ठिकाणीं शौर्याचे झरे फुटूं लागले. बायका आणि मुलें हीं लढाईच्या कामीं कुचकामाचीं; पण परमेश्वराच्या कृपेमुळें टायरोलच्या लढाईमध्यें त्यांनींहि आश्चर्य करण्यासारखीं कार्यें केलीं. हॉल हें शहर बव्हेरियन लोकांच्या ताब्यांतून जिंकून घेण्याला बायकामुलांचाच उपयोग झाला. त्यांनीं एका बाजूनें टेकड्यांवरून मोठा जाळ पेटविला. त्यावरून हॉल शहरांतील बव्हेरियन लोकांना असें वाटलें कीं, शेतकऱ्यांचें सैन्य आलें तर तें याच बाजूनें आलें पाहिजे, म्हणून शहरांतील सर्व सैन्य तिकडे जाऊन शत्रूची वाट पाहत बसलें. आणि इकडे जी बाजू मोकळी पडली होती त्या बाजूनें टायरोलीज लोकांचा पुढारी स्पेक्बेचर हा आपलें सैन्य घेऊन हॉलमध्यें घुसला व त्यानें तें शहर एकदम हस्तगत करून घेतलें. त्या शहरांत चारशें बव्हेरियन लोक कैद करण्यांत आले; त्यांना हॉल शहरामधून मुख्य

ठाण्यावर नेऊन पोहोंचतें करावयाचें होतें. त्या वेळीं त्यांच्याबरोबर रखवालदार म्हणून पाठविण्यांत गुंताविण्याइतके पुरुष टायरोलीज लोकांपाशीं नव्हते म्हणून त्या कैद्यांवरील रखवालीचें काम टायरोलच्या स्त्रियांनीं आपल्याकडे घेतलें. अशा स्त्रिया ज्या देशांत आहेत तो देश गुलामगिरीमध्यें काय म्हणून राहील ?

## दहा वर्षांच्या मुलाचा पराक्रम

परंतु ह्या स्वातंत्र्याच्या लढाईमध्यें टायरोलचीं मुलेंही घरांमध्यें टेनिस किंवा बिलियर्ड्स खेळत बसलेलीं नव्हतीं. तींहि यथाशक्ति आपल्या आईबापांना मदत करीत होतीं. टायरोलीज पुढारी खुद्द स्पेक्‌बेचर याच्या मुलाची गोष्ट ह्या संबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. टायरोलनें आपल्या पायांतील पारतंत्र्याची बेडी तोडून टाकण्याला प्रारंभ केला त्या वेळीं ह्या मुलाचें वय सारें दहा वर्षांचें होतें. असें असूनही तो मुलगा लढाईच्या प्रसंगीं आपल्या बापाच्या जवळ असे. एके प्रसंगीं बंदुकीच्या गोळ्यांचा भडिमार फारच सुरू झाला. त्या वेळीं, वात्सल्यातिशयामुळें स्पेक्‌बेचरनें आपल्या मुलाला समरभूमि सोडून जाण्यास सांगितलें. बापाची आज्ञा मोडावयाची नाहीं म्हणून तो थोडासा दूर गेला. परंतु त्याच्यानें समरभूमि सोडून जाववेना म्हणून तो फिरून लागलाच माघारा आला. तो परत आलेला पाहून बापाला राग आला, व त्यानें त्याला चापटी मारून तेथून त्याला फिरून जावयास सांगितलें. तेव्हां तो बापाच्या नजरेआड गेला, परंतु आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची इमारत जेथें उभारली जात आहे त्या समरभूमीपासून त्याच्यानें दूर

जाववेना. टायरोलच्या शिपायांना दारूगोळा वगैरे सामानाची फारच वाण होती. तेव्हां आपल्या हातून आपल्या देशाची फार मोठी सेवा झाली नाहीं, तर निदान जेवढी होईल तेवढीच करावी अशा बुद्धीनें तो मुलगा समरभूमीवरून न जातां त्या समरभूमीवर शत्रूकडून येऊन पडलेल्या गोळ्या वेचूं लागला व त्यानें आपल्या डोकीवरची टोपी त्या गोळ्यांनीं भरून टाकली. दुसरे दिवशीं सकाळीं त्या गोळ्या आपल्या बापापुढें ठेवून ह्यांतील प्रत्येक गोळी तुम्ही शत्रूच्या छातीमध्यें मारा अशी त्यानें आपल्या बापापाशीं मोठ्या आग्रहानें विनवणी केली. जेव्हां एखाद्या देशाचा ऊर्जित काळ येतो, त्या वेळेला दहा वर्षांच्या मुलांच्या मनामध्यें-देखील अशा प्रकारची स्वातंत्र्यप्रीति संचार करूं लागते. नाहीं तर साठ साठ पावसाळे उलटून गेलेल्या लोकांच्या मनाला हे विचार शिवतसुद्धां नाहींत आणि उलट पारतंत्र्याचीं हाडें चघळीत बसण्याची संवय झाल्यामुळें त्यांना त्यांतच गोडी वाटूं लागते.

## स्वार्थनिरपेक्षतेचीं उदाहरणें

दुसरी एक विलक्षण तऱ्हेची उदात्त मनोवृत्ति ह्या टायरोलच्या लढाईमध्यें दिसून आलेली आहे. ती ही कीं, आपलें स्वतःचें कांहीं झालें तरी हरकत नाहीं, परंतु आपला देश एकदांचा स्वतंत्र झाला पाहिजे, अशी उत्कट इच्छा टायरोलच्या सर्व लोकांमध्यें संचार करून राहिली होती. त्यामुळें टायरोलीज सैन्यांतील ज्या लोकांना जखमा होत ते समरांगणावरच पडून राहत. वास्तविक पाहिलें तर जखमी झालेल्या लोकांना उचलून दवाखान्यांत नेऊन

औषधोपचार करणें फार जरूरीचें आहे. परंतु टायरोलच्या जखमीं झालेल्या शिपायांना जर कोणी त्यांचे सोबती उचलून नेऊं लागले तर ते त्यांना असें म्हणत असत : 'आपलें सैन्य आधींच फार थोडें आहे, त्यांतून तुम्ही आणखी कांहीं लोक जर आम्हांला उचलून नेण्यासाठीं आलां, तर आपली संख्या आणखीहि कमी होईल. याकरितां तुम्ही आम्हांला उचलून नेण्यासाठीं येऊं नका. तुम्ही लढतच रहा. तुम्ही आम्हांला न्यायला आलां तरीदेखील आपल्या सैन्याची शक्ति कमी करून आम्हांला येथून जाण्याची इच्छा नाहीं. आमचें कांहीं झालें तरी आम्ही येथेंच राहणार. तुम्ही मात्र लढाई करून शत्रूला जिंका.' केवढी ही स्वार्थनिरपेक्षता ! आणि केवढी ही स्वातंत्र्याची अभिरुचि ! हे शूर जखमी टायरोलीज शिपाई मरून गेले असतील, परंतु त्यांचे हे शब्द पुढील किती तरी पिढ्यांना निरपेक्षता शिकवितील ! टायरोलमधील स्त्रिया रखवालदार बनल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे, परंतु त्याशिवायहि त्या अनेक कामें करीत होत्या. टायरोलीज शिपाई पुढें लढत होते आणि त्यांच्या रांगांच्या पाठीमागून टायरोलमधील बायका त्यांना दारूगोळा, अन्न व पाणी यांचा एकसारखा पुरवठा करीत होत्या. अशा रीतीनें टायरोलमधील पुरुष आणि स्त्रिया, धट्टेकट्टे आणि जखमी झालेले, मोठीं माणसें आणि लहान मुलें, सर्व एकभावानें व एकजुटीनें टायरोलच्या स्वतंत्रतेसाठीं जिवापाड मेहनत करीत होते. त्यामुळें शत्रूचें सामर्थ्य ज़री अमर्याद होतें तरीहि टायरोलीज लोकांना अखेरीस यश आलें.

## नेपोलियनचा विरोध

लढाईला सुरुवात केल्यापासून आठ दिवसांमध्यें टायरोल स्वतंत्र झालें. टायरोलचे जे किल्ले शत्रूच्या हातांत होते ते सर्व टायरोलीज लोकांच्या स्वाधीन झाले. शत्रूचें एकंदर दहा हजार सैन्य उध्वस्त होऊन गेलें. जेथें बव्हेरियाची अफाट सत्ता पसरली होती तेथें त्याचें नांवसुद्धां राहिलें नाहीं. आणि ह्या सगळ्या घडामोडी केवळ आठ दिवसांच्या अवकाशांत टायरोलच्या लोकांनीं घडवून आणल्या. परंतु टायरोलीज लोकांचीं संकटें येथेंच संपलीं नाहींत. टायरोल आपल्या दाढेंतून निसटत आहे ही बातमी नेपोलियनला कळल्याबरोबर त्याला फार क्रोध आला, व या बंडाचा सगळा दोष तो ऑस्ट्रियाला देऊं लागला; व ऑस्ट्रियन लोकांनीं टायरोलमध्यें हें बंड उत्पन्न केलें असें तो स्पष्टपणें म्हणूं लागला. आणि जे ऑस्ट्रियन सेनापति टायरोलच्या मदतीला आलें होते त्यांना एकदम पकडून आणावें, चोवीस तासांच्याआंत त्यांना गोळ्या घालून मारून टाकावें, असा त्यानें हुकूम सोडला. नेपोलियनची ही नेहमींची खुबीच असे कीं, त्याच्याविरुद्ध एखादी गोष्ट घडली म्हणजे ती करणारांना तो कांहींतरी नांवें ठेवीत असे. व त्यांनीं मोठे भयंकर अन्याय केलेले आहेत व त्यांना कडक शासन केलें पाहिजे असा त्यांच्याबद्दल तो चोहोंकडे बभ्रा करून सोडीत असे. त्यामुळें भोळसर लोकांचें लक्ष नेपोलियननें केलेल्या अन्यायावरून दुसऱ्यांच्या अन्यायाकडे वळत असे. नेपोलियननें आपलें सैन्य टायरोलमध्यें जमा केलें. मार्शल लेफेबव्हर हा आपलें अफाट सैन्य घेऊन टायरोलमध्यें आला व साल्सबर्ग, फ्यूअर सिंगर, वूर्गल वगैरे ठिकाणीं उभयपक्षांच्या

चकमकी होऊन अखेरीस फ्रेंच आणि बव्हेरियन सैन्यांनीं इन्स्ब्रुक शहर तारीख १९ मे रोजीं टायरोलिज सैन्याच्या हातून परत घेतलें. नेपोलियनच्या उत्तेजनानें ही जी मोहीम सुरू झाली होती तीमध्यें बव्हेरियाच्याच पक्षाला यश येत गेलें व टायरोलिज लोक फिरून हताश होऊं लागले. आणि त्याच सुमाराला दुसरीकडून मोकळें झालेलें पंधरा हजार फ्रेंच सैन्य टायरोलकडे चाल करून येत होतें. आणि ऑस्ट्रियाचे जे सरदार टायरोलच्या साहाय्यासाठीं आले होते तेहि हताश होऊन परत जाऊं लागले होते. अशा प्रसंगीं टायरोलच्या शेतकऱ्यांनीं फिरून धीर धरून शत्रूच्या सैन्याला तोंड दिलें.

## होफरचें पत्र

ह्या प्रसंगीं होफरनें लढाईच्या पूर्वींच्या दिवशीं आपल्या देश-बांधवांना जें एक पत्र पाठविलें होतें त्यांत त्यानें असें लिहिलें होतें :

> " देशबांधवहो, आपल्या देवासाठीं आणि आपल्या देशासाठीं जिवावर उदार होऊन लढण्याकरितां उद्यांची प्रातःकाळ ही वेळ ठरविण्यांत आलेली आहे. परमेश्वराच्या कृपेनें आपण बव्हेरिअन्सना इन्स्ब्रुकमधून खात्रीनें हाकलून देऊं असा देवाचाच संकेत दिसत आहे. तेव्हां तुम्ही सर्व जण आमच्या मदतीला या. परंतु जर परमेश्वरापेक्षां आपल्याला जास्त समजतें आहे असें तुम्हांला वाटत असेल, तर आम्ही तुमच्या-वांचूनही लढाई करीत आहों."

याचा परिणाम फार चांगला होऊन सर्व लोक तयार झाले. स्पेक्बेचर यानेंहि या प्रसंगीं फार शौर्य गाजविलें व टायरोलीज लोक अखेरीस यशस्वी होऊन इन्स्ब्रुक शहर फिरून त्यांचे ताब्यांत आलें. आणि

त्यामुळें टायरोलच्या लोकांना फिरून आनंद प्राप्त झाला. परंतु त्या सुमाराला दुसरीकडे ऑस्ट्रियाचा बादशहा आणि नेपोलियन ह्यांच्यामध्यें एक संग्राम चाललेलाच होता. त्याचा शेवट वॅग्रामच्या लढाईमध्यें पराभव होऊन ऑस्ट्रियाच्याविरुद्ध झाला; व फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यामध्यें तह ठरून त्या तहाप्रमाणें आस्ट्रियाला टायरोलमधून आपलें सैन्य काढून घेणें भाग पडलें. टायरोलला मुख्य आश्रय काय तो ऑस्ट्रियाचाच होता. परंतु तो आश्रय अशा रीतीनें एकाएकीं तुटल्यामुळें सर्व टायरोलीज लोकांची अगदीं कंबर खचून गेली आणि बरेच शेतकरी निराश होऊन आपापल्या घरीं जाऊन बसले. टायरोलला स्वातंत्र्याची आशा उरली नाहीं आणि आजपर्यंत केलेले सर्व प्रयत्न निष्फळ होण्याच्या बेतांत आले. तरी पण टायरोलचे शेतकरी दुसऱ्याच्या गुलामगिरीमध्यें राहण्याला खुषी होईनात. अशा प्रसंगीं सर्वांचे डोळे होफरकडे लागले. तेव्हां पुष्कळ लोकांची एक सभा जमली असतां त्या सभेमध्यें सर्वांना आश्वासन देऊन होफरनें असें सांगितलें कीं, ‘ माझ्या शरिरांतील शेवटचा रक्ताचा बिंदु गळून पडेपर्यंत मी तुमचा पक्ष सोडणार नाहीं.’ होफरच्या या अभिवचनामुळें लोकांना पुष्कळ धीर आला. परंतु टायरोलच्या स्वातंत्र्याच्या सूर्यावर एकापाठीमागून एक जास्तच अभ्रें येऊं लागलीं. टायरोल कायमचें पादाक्रांत करून टाकावयाचें अशा इच्छेनें नेपोलियननें दुसरीकडून मोकळीं झालेलीं सैन्यें टायरोलमध्यें आणून घातलीं आणि टायरोलच्या वतीनें प्रतिबंध करण्याला जाग्यावर कोणीहि नसल्यामुळें थोड्याच वेळामध्यें तीस हजार फ्रेंच सैन्यानें इन्स्ब्रुक शहरामध्यें येऊन आपला तळ दिला. इन्स्ब्रुक अशा रीतीनें

शत्रूच्या हातांत गेलेलें पाहून आतां मात्र टायरोलच्या स्वतंत्रतेची लढाई कायमची संपली असा सर्वांचा समज झाला. परंतु हा समज चुकीचा होता. नेपोलियनच्या अवाढव्य सैन्यानें सर्व युरोप खंडाची दृष्टि चकित होऊन गेलेली होती व त्या सैन्यापुढें टायरोलचे कांहीं एक चालावयाचें नाहीं अशी सर्वांची खात्री होऊन चुकलेली होती. परंतु टायरोलीज शेतकऱ्यांच्या स्वदेशभक्तीनें आणि पराक्रमानें फिरून एकदां हा समज खोटा ठरविला.

## इन्स्भुक परत जिंकलें

टायरोलमधील ऑस्ट्रियाचें सैन्य निघून जाऊं लागल्यामुळें टायरोलची स्थिति निराश्रित होत चालली होती; व याउपर टायरोलनें स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करणें अगदीं फुकट आहे असें वाटून ऑस्ट्रियन सरदार टायरोलच्या पुढाऱ्यांना आपल्याबरोबर टायरोल सोडून चलण्याविषयीं स्नेहबुद्धीनें फार फार आग्रह करीत होते. आणि स्पेकूबेचर यानें तर टायरोल सोडून जाण्याचा निश्चयहि केलेला होता. परंतु निघण्यापूर्वीं तो जेव्हां होफरची भेट घेण्याकरितां गेला तेव्हां उभयतांच्या गांठी पडून अखेरीस स्वदेशभक्तीचाच विजय झाला. शेवटपर्यंत आपल्या देशांतच राहून, आपण आपल्या देशाचा उद्धार करूं, असा होफरनें स्पेकूबेचरला बोध केला व त्याप्रमाणें स्पेकूबेचर राहिला. परंतु होफरच्या मनाला तरी स्वस्थता कोठें होती? स्वदेशभक्ति त्याला आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं फिरून प्रयत्न करण्याविषयीं एका बाजूनें उत्तेजन देत होती; परंतु दुसऱ्या बाजूनें प्रत्येक क्षणीं निराशा त्याचे हातपाय मोडीत होती.

अशा रीतीनें, काय करावें हें कांहींच सुचेनासें झाल्यामुळें होफर पहाडांतील एकांतवासामध्यें परमेश्वराची प्रार्थना करीत कित्येक दिवस जाऊन राहिला. जोसेफ हॉस्पिंजर ह्याचेंहि मन असेंच अस्वस्थ झालेलें होतें. टायरोलमधील शेतकरी मात्र शस्त्र घेऊन स्वतंत्रतेसाठीं लढण्याला अगदीं तयार झालेले होते, परंतु त्यांना कोणी पुढारी मिळेना. अखेरीस हे टायरोलचे सर्व देशभक्त एकदां एके ठिकाणीं जमले, व तेथें त्या शेतकऱ्यांनीं, 'आपण आपला प्राण घालवूं पण स्वतंत्रता घालविणार नाहीं' अशी शपथ वाहिली. व पुढें कसें काय करा-वयाचें ह्याबद्दल सर्व व्यवस्था ठरविण्यांत आली. व हॉस्पिंजर, होफर वगैरे मंडळींनीं त्या शेतकऱ्यांचा पूर्वीप्रमाणें पुढारीपणा पत्करला आणि लढाईचा निश्चय ठरला. होफर आतां हतवीर्य झाला असें समजून त्यानें आपल्याला शरण यावें यासाठीं त्याच्या शत्रूंनीं त्याला ११ ऑगस्ट रोजीं इन्स्प्रुक येथें आपल्यापुढें हजर राहण्याविषयीं हुकूम पाठविला होता. त्यावर लढाईचा निश्चय झाल्यामुळें होफरनें मोठ्या शौर्यानें असा उलट जबाब पाठविला कीं, 'मी आपल्या म्हणण्याप्रमाणें इन्स्प्रुक येथें येणारच आहें; परंतु मी आपल्याबरोबर दहा हजार तरिकमठेवाले लोक मात्र घेऊन येणार आहें.' हा निरोप म्हणजे लढाईला आव्हानच होतें. व ता. ४ ऑगस्ट रोजींच लढा-ईचें तोंड लागलें. शत्रूचें सैन्य एक दरी उतरून चाललें होतें. त्या दरीमध्यें त्या सैन्याच्या वाटेच्या बाजूनें उंच डोंगरावर दाट झाडी-मध्यें हॉस्पिंजरच्या हाताखालीं शेतकरी लोक दबा धरून बसले होते. त्यांनीं शत्रु आटोक्यांत येतांक्षणींच चोहोंबाजूंनीं मारा सुरू केला. तेव्हां शत्रूचें सैन्य अगदींच गोंधळून गेलें. त्याच धांदलीमध्यें ज़वळच

एक पूल होता तो एकाएकीं मोडून त्याचीं लाकडें, दगड वगैरे शत्रूंच्या अंगावर कोसळून त्यांचा अतिशय संहार झाला व अशा रीतीनें हॅस्पिंजरच्या सैन्याला यश आलें. ह्यानंतर लेफेबव्हर याच्या सैन्याचा होफर आणि स्पेकूबेचर यांनीं एका डोंगरामध्यें पराभव केला. अशाच प्रकारच्या आणखी दोन-चार ठिकाणीं लढाया होऊन त्या सर्वांमध्यें बव्हेरियन लोकांचाच पराभव झाला व अखेरीस इनूस्प्रुक हें शहर टायरोलीज लोकांच्या हातीं आलें. ह्या लोकांच्या लढाईमध्यें बव्हेरियाचे सहा हजार लोक जायबंदी झाले.

## देशाचा कारभारी—होफर

ह्या विजयाचा परिणाम असा झाला कीं, त्याच्या योगानें शत्रूचा दम सुटला. मार्शल लेफेबव्हर हा आपलें सैन्य घेऊन परत जाण्याकरितां निघाला आणि त्यामुळें सर्व टायरोल शत्रूच्या सैन्यापासून निर्भय झालें आणि बव्हेरियाच्या अमलापासून आपली पूर्णपणें मुक्तता झाल्याबद्दल टायरोलमधील सर्व लोकांना आनंद झाला. ज्या स्वतंत्रतेसाठीं आपण लढत होतों ती आपल्याला प्राप्त झाली असें पाहून, टायरोलच्या सर्व लोकांना समाधान वाटूं लागलें. ह्याप्रमाणें लोक आनंदामध्यें असतांना होफरनें इनूस्प्रुक शहरामध्यें मोठ्या थाटानें प्रवेश केला. त्या वेळचा तो समारंभ फार प्रेक्षणीय होता, आणि लोकांचा उल्हास अवर्णनीय होता. होफर यानें शहरांत प्रवेश केला आणि तेथील किल्ल्यामध्यें तो जाऊन राहिला, व सर्व लोकांच्या संमतीनें सर्व टायरोल देशाचा अधिकार होफरनें आपल्या हातामध्यें घेतला. त्याला सर्व लोकांनीं टायरोलचा ‘कमांडर-इन्-चीफ’

३/८/८ ? ३९२३१८९

अशी पदवी दिली. ह्याप्रमाणें मुल्की आणि लष्करी अशी दोन्ही प्रकारची सत्ता हॉफरचे हातामध्यें येऊन तो तेथील मुख्य अधिकारी बनला; तेव्हां त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली, आणि आपल्या नांवाचें नवीन नाणें पाडून सुरू केलें; व त्या वेळेपासून टायरोलचे लोक स्वतंत्रतेचा उपभोग घेऊं लागले.

## रोमहर्षक कथानक

टायरोलचा इतिहास अजून पुष्कळ लांब आहे; पण आम्हांला टायरोलबद्दलची जी गोष्ट सांगावयाची होती ती येथें संपली. या गोष्टीमध्यें पुष्कळ तात्पर्य आहे. गोष्टीमध्यें चांगला उपदेश करण्याचें सामर्थ्य आहे, आणि हें कथानक रोमहर्षक असून फिरून उल्हासजनकही आहे. गारठलेल्या मनामध्यें ही गोष्ट उष्णता उत्पन्न करील, हताश झालेल्या मनाला ही गोष्ट उत्तेजन देईल, आणि दुर्बळ मनुष्याच्या अंगांत ही गोष्ट शक्ति उत्पन्न करील. हा इतिहास मोठ्या राजांच्याहि मनांत क्षणभर भीति उत्पन्न करील, आणि अत्यंत देशद्रोही मनुष्याच्याहि मनांत अक्षय स्वदेशप्रीति उत्पन्न करील; मोठ्या राजानेंहि सदाचरणानें चालावें आणि गुलामगिरींत सांपडलेल्या लोकांनींहि धैर्य सोडूं नये, हा या गोष्टींतील हेतु आहे. खऱ्या स्वदेशभक्तीनें पाहिजे ती गोष्ट होऊं शकते हा ह्या कथेंतील अभिप्राय आहे. बलाढ्य राजा आणि गरीब शेतकरी हा मनुष्यामधील खरा भेद नव्हे, ह्या भेदावर ईश्वरी कृपा अवलंबून नाहीं, अन्यायी कोण आहे आणि न्यायी कोण आहे हें परमेश्वर पाहत असतो, आणि तदनुरोधानें तो आपल्या फळांची वांटणी

करीत असतो; म्हणून राजांनीं आणि रंकांनीं, धन्यांनी आणि गुलामांनीं, सशक्तांनीं आणि अशक्तांनीं—सर्वांनीं नेहमीं न्यायानें वागण्याचा प्रयत्न करीत असावें हें उत्तम बोधामृत ही गोष्ट आपल्याला पाजीत आहे. त्याचें आपण विचारपूर्वक सेवन केलें पाहिजे.

3963
सा. वा.

IRBK-0103173

# सुलभ विश्वकोश

संपादक : य. रा. दाते आणि चिं. ग. कर्वे

- पृष्ठें २००० (शब्दकोश आकाराचीं) शिवाय १००० वर चित्रें व नकाशे.
- निरनिराळ्या शास्त्रांतील अनेक विषयांवर लहान लेख.
- जगांतील थोर थोर पुरुषांचीं संक्षिप्त चरित्रें.
- देशांचीं आणि स्थळांचीं वर्णनें.
- सर्व राष्ट्रांचे, जातींचे आणि लोकांचे राजकीय, सामाजिक व धार्मिक इतिहास.
- या अभिनव 'संक्षिप्त ज्ञानकोशां'त सुमारें १५००० लहान मोठे लेख येतील.

सुलभ विश्वकोशाच्या कामाला सुरुवात झाली असून, लेखन-संपादनाचें काम १९४७ अखेर पुरें होईल व १९४९ चे जानेवारींमध्यें अत्यंत सुंदर छपाई, मोहरेदार कागद व संपूर्ण कापडी बांधणी करून, हा कोश प्रसिद्ध करण्यांत येईल.

**प्रसिद्धीनंतर किंमत १०० रुपये**

पण पहिल्या ५०० ग्राहकांना हा कोश फक्त ५० रुपयांत देण्यांत येईल. पन्नास रुपये आगाऊ पाठवून आजच आपलें नांव नोंदवा.

५०० ग्राहक होतांच ही सवलत बंद करण्यांत येईल.

व्यवस्थापक—य. गो. जोशी-प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणें २.